www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक
# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■वर्ष - ०२ ■अंक ३२ ■पृष्ठे- ०६ ■ठाणे, शुक्रवार, ०७ जून २०२४ ■RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ■रु.२/-

## थोडक्यात



### कोल्हापुरात नवीन राजवाड्यात शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात

● कोल्हापूर, दिगंबर जाधव :

कोल्हापूर येथील नवीन राजवाड्यासमोर शिवराज्याभिषेक सोहळा गुरुवारी उत्साहात पार पडला. सनई चौघड्याच्या निनादात पार पडलेल्या या कार्यक्रमाचे शिवरायांची सुवर्णमूर्ती मुख्य आकर्षण होते.

अखिल भारतीय शिवराज्याभिषेक समितीच्या वतीने दुर्गराज रायगडावर माजी खासदार संभाजी राजे छत्रपती यांच्या पुढाकाराने राज्याभिषेक सोहळा पार पडला. तर कोल्हापूर येथे नवीन राजवाड्याच्या प्रांगणात प्रथमच झालेल्या सोहळ्याची सुरुवात सनई चौघड्याच्या वादनाने झाली. मराठा लाइट इन्फंट्री बँड बेळगावचे सादरीकरण लक्षवेधी होते. शककर्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सुवर्णमूर्तीवर खासदार श्रीमंत शाहू महाराज छत्रपती, याज्ञसेनीराजे छत्रपती महाराणी, युवराज मालोजीराजे, मधुरीमाराजे छत्रपती, यौवराज यशस्विनीराजे, यशराजराजे यांच्यासह करवीरकरांच्या उपस्थितीत अभिषेक करण्यात आला.

पान २ वर

## रुंदीकरण केलेल्या ठाण्यातील रेल्वे फलाटावर पावसाच्या पाण्याचे तळे, लोकलमध्ये चढताना प्रवाशांची कसरत

● ठाणे, रोहित जैसवाल :



६२ तासांचा मेगाब्लॉक घेऊन ठाणे रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक पाच आणि सहाचे रुंदीकरण करण्यात आले. कमी कालावधीत केलेल्या या कामांचा सर्वस्तरातून गौरव झाला. आता पाऊस पडल्यावर या रुंदीकरण केलेल्या फलाटावर पावसाच्या पाण्याचे तळे साचते. या तळयातून लोकलमध्ये चढताना विशेषता महिलांना मोठी कसरत करावी लागत आहे, अशा तक्रारी प्रवाशांनी केल्या आहेत.


ठाणे रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक पाचवर केलेल्या रूंदीकरणाचे काम सिमेंट काँक्रीटचे आहे. हे काम मजबूत होण्यासाठी त्याच्यावर घायपताच्या गोण्या टाकण्यात आल्या आहेत. या गोण्यांवर सकाळ, संध्याकाळ ठेकेदार पाणी मारतो. त्यामुळे सिमेंटमधील ओलावा कायम राहून हे काम मजबूत होईल. परंतु, या गोण्या ओल्या असल्यामुळे फलाटावर लोकल आली की या ओल्या गोण्या प्रवाशांच्या पायात अडकतात, अनेक प्रवाशांच्या चपला या गोण्यांमध्ये अडकत असल्याने ते पाय घसरून फलाटावर पडत आहेत. गुरुवारी सकाळी दहा वाजताच्या दरम्यान ठाणे रेल्वे स्थानक परिसरात पाऊस पडला. यावेळी रुंदीकरण केलेल्या फलाटावर छप्पर नसल्याने आणि पावसाचे पाणी थेट फलाटावर पडल्याने या फलाटावर पाण्याचे तळे साचले होते.

पान २ वर

## मुंबईकरांनो 'या' दिवसांत समुद्रावर जायचे टाळा

● मुंबई, यश सावंत :

### समुद्राला मोठी भरती असून उंच लाटा उसळणार



मान्सूनने गोव्यापर्यंत धडक दिली आहे. काहीच दिवसांत मान्सून संपूर्ण महाराष्ट्र राज्य व्यापणार आहे. राज्यातील काही भागात मान्सूपूर्व पावसाच्या सरी बरसल्या आहेत. दरम्यान असे असेल तरी मुंबईत अजूनही समाधानकारक पाऊस झाला नाहीये. मुंबई महानगर पालिकेने धोक्याचा इशारा दिला असून समुद्रात जाऊ नये तसंच, किनाऱ्यापासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे.

पावसाळयात समुद्रात उंच लाटा उसळत आसतात.जून महिन्यात ७,८,२३,२३,२४ आणि २५ जूनला मोठी भरती आहे. समुद्राच्या भरती दरम्यान पर्यटक मुंबईतल्या समुद्रकिनारी मोठी गर्दी करतात. यातून अपघात होण्याची शक्यता असते. त्यामुळं यापासून सावध करण्यासाठी बचाव करण्यासाठी जीवरक्षक आणि मुंबई पोलीस समुद्रा किनारी तैनात करण्यात येतात. त्याच पार्श्वभूमीवर मुंबई महानगरपालिकेवे नागरिकांना इशारा दिला आहे.

मुंबई महानगरपालिकेने दिलेल्या इशाऱ्यानुसार शुक्रवारी ७ जून आणि ८ जूनलाही साडेचार मीटर उंचीच्या लाटा उसळणार आहे. या दरम्यान मोठा पाऊस पडल्यास सखल भागात पाणी साचून मुंबईची वाहतूक खंडित होऊ शकते.

पान २ वर

## नवी मुंबई आर्थिक केंद्रापुढे पाणथळींसह खारफुटींचा अडसर

● नवी मुंबई, भावना जैन :



एका मोठ्या उद्योग समूहाने उरण परिसरात नियोजित केलेल्या सेझच्या जमिनीवर जागतिक आर्थिक केंद्राविरोधात पर्यावरणप्रेमींनी केलेल्या तक्रारीची मुख्यमंत्री कार्यालयाने दखल घेऊन याबाबत राज्याच्या पर्यावरण विभागाला चौकशीचे निर्देश दिले आहेत.

नवी मुंबईतील खारफुटी क्षेत्रांसह पाणथळींवर ३७५० एकरावर हे जागतिक आर्थिक केंद्र विकसित करण्यात येणार आहे. याबाबत रिलायन्स इंडस्ट्रिज लिमिटेड आणि राज्य सरकार यांच्यात २०१८ मध्ये सेझ विकसित करण्याचा सामंजस्य करार झाला असून, त्याचाच हे आर्थिक केंद्र भाग आहे. पान २ वर

## खासदार होताच बाळ्या मामा ॲक्शन मोडमध्ये

### काल्हेर येथील शासकीय जमिनींवर केलेल्या अनधिकृत बांधकामांची केली पाहणी


● भिवंडी, विशाल पाटील :



भिवंडी लोकसभा मतदारसंघात खासदार म्हणून निवडून आलेले सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा निवडून आल्याच्या दुसऱ्या दिवशी ॲक्शन मोडवर आले आहेत. बाळ्या मामा यांनी बुधवारी काल्हेर येथील शासकीय जमिनीवर केलेल्या अनधिकृत बांधकाम व अतिक्रमणांची बाळ्या मामा यांनी पाहणी केली. जनतेच्या आशीर्वादाने मी खासदार झालो आहे.

त्यामुळे येथील शेतकरी व जनसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्याची मुख्य जबाबदारी माझ्यावर आली आहे. काल्हेर येथे सुमारे २६ एकर शासकीय जागेवर शासकीय तसेच वन विभाग व स्थानिक नागरिकांच्या जागेवर नागरिकांना दमदाटी करून व अतिक्रमण करून येथील बांधकाम व्यावसायिक श्रीधर पाटील ,भरत पाटील,नितीन पाटील या बांधकाम व्यावसायिकांनी या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम केले आहे. पान २ वर

## 'आरटीई' घोटाळा : भाऊ राजा शरीफला रविवारपर्यंत पोलीस कोठडी




● नागपूर, नितीन देवळेकर :

आरटीईअंतर्गत शाळा प्रकरणातील मुख्य आरोपी शाहिद शरीफ हा अद्याप फरार असला तरी सदर पोलिसांनी त्याचा भाऊ राजा शरीफला अटक केली आहे. न्यायालयाने त्याला ८ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. तपासात तो पोलिसांना सहकार्य करीत नाही. याप्रकरणासंदर्भात मला काहीच माहिती नाही, शरीफशी माझा काहीच संबध नाही, असा पाढा तो पोलिसांसमोर वाचतो. मात्र,त्याच्याकडून माहिती काढून घेण्यास पोलीस प्रयत्नशील आहेत.

राजा शरीफ हा आरटीईतून प्रवेश घेण्यास इच्छुक श्रीमंत पालकांचा शोध घेऊन शाहिदसाठी ग्राहक शोधण्याचे काम करीत होता. याच माहितीवरून सदर पोलिसांनी मंगळवारी दुपारच्या सुमारास त्याला ताब्यात घेतले. पोलीस पकडणार अशी कुणकुण लागताच तो कारने टीव्ही टॉवरकडून फुटाळाकडे जात असताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनीष ठाकरे यांच्या पथकाने पाठलाग करून त्याला पकडले. त्याला अटक करून बुधवारी न्यायालयात आणले. १९ मे रोजी सदर पोलिसांनी गट शिक्षणाधिकारी कवडू दुर्गे यांच्या तक्रारीवरून बनावट कागदपत्रांद्वारे मुलांना आरटीई अंतर्गत प्रवेश मिळवून देणाऱ्या प्रशांत हेडाऊ आणि राजेश बुवाडेविरुद्ध गुन्हा नोंदविला होता.

पान २ वर

## विद्युत वाहिनीच्या धक्क्याने सफाई कर्मचारी महिलेचा मृत्यू, बालेवाडी भागातील दुर्घटना

● पुणे, अभिजित येरल्लू :



उघड्यावर असलेल्या विद्युत वाहिनीचा धक्का बसल्याने सफाई कर्मचारी महिलेचा मृत्यू झाल्याची घटना बालेवाडी भागात घडली.चंद्रकला नरसिंग मिरदुडे (वय ४५, रा. विसर्जन घाट, बालेवाडी गाव) असे मृत्युमुखी पडलेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत चंद्रकला यांचा मुलगा संदीप यांनी चतु:शृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चंद्रकला बालेवाडीतील अमर टेकपार्क इमारतीत सफाई कर्मचारी म्हणून काम करत होत्या. कंत्राटी पद्धतीने त्या तेथे काम करत होत्या. मंगळवारी दुपारी शहरात मुसळधार पाऊस झाला. काम आटोपल्यानंतर चंद्रकला बसथांब्याकडे निघाल्या होत्या. बालेवाडी भागातील पदपथाच्या बाजूला पाणी साचले होते. या परिसरात विद्युत वाहिनी उघड्यावर पडली होती. तेथून निघालेल्या चंद्रकला यांना विजेचा धक्का बसल्याने त्या कोसळल्या. बेशुद्धावस्थेत चंद्रकला पडल्याची माहिती त्यांचा मुलगा संदीप यांना मिळाली. त्यानंतर चंद्रकला यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती पोलीस, तसेच महावितरणच्या अधिकाऱ्यांना कळविण्यात आली. महावितरणच्या तंत्रज्ञांनी घटनास्थळी धाव घेतली. वीज पुरवठा खंडीत करण्यात आला. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळाची पाहणी केली. याप्रकरणी पोलिसांकडून महावितरणला अहवाल सादर करण्यात येणार आहे. त्यानंतर संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पान २ वर

## महाराष्ट्र सदन प्रकरणातील झोपडीवासीयांची इमारत धोकादायक घोषित

● मुंबई, विशाल कारंडे :



### इमारतीच्या पाडकामाला सुरुवात

राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांना तुरुंगवास भोगावा लागलेल्या महाराष्ट्र सदन प्रकरणातील १५ वर्षे जुनी इमारत महापालिकेने धोकादायक घोषित केली आहे. ही इमारत पाडण्यासाठी विकासकाने गच्चीवर बुलडोझर नेला असून त्याचे वजन धोकादायक इमारतीने मात्र पेलले आहे. त्यामुळे एखादी इमारत धोकादायक घोषित करण्याच्या महापालिकेच्या कार्यपद्धतीबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मे. चमणकर इंटरप्राईझेस यांनी झोपडीवासीयांचे पुनर्वसन केले नाही, असे स्पष्ट करीत या योजनेतून त्यांना काढून टाकल्यानंतर मे. शिव इन्फ्रा व्हिजन प्रा. लि. या विकासकांची नियुक्ती करण्यात आली. या विकासकाला या योजनेसाठी २०१९ मध्ये इरादा पत्र जारी करण्यात आले. तीन वर्षात झोपडीवासीयांचे पुनर्वसन करण्याची प्रमुख अट होती. मात्र आता पाच वर्षे होत आली तरी या विकासकाने झोपडीवासीयांचे पुनर्वसन केलेले नाही.

पान २ वर

## सरकार स्थापनेच्या आधी जदयूच्या मागण्या सुरु, अग्निवीर योजनेसंदर्भात केली महत्वाची मागणी



● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

लोकसभा निकालानंतर सत्तास्थापनेचा फक्त दावा एनडीएने केला आहे. शपथविधी, मंत्रिपदं हे सगळं ठरायचं आहे. त्याआधीच एनडीएने अग्निवीर योजनेबाबत महत्त्वाची मागणी केली आहे. त्यामुळे पहिल्या दोन कार्यकाळांपेक्षा मोदींचा हा कार्यकाळ नक्कीच वेगळा असणार आहे. जनता दल युनायटेड च्या एका नेत्याने सशस्त्र दलांमध्ये भरतीसाठी केंद्राच्या अग्निवीर योजनेचा आढावा घेणार असल्याचं म्हटलं आहे. अग्निवीर योजनेमुळे मतदारांचा एक वर्ग नाराज आहे. आमच्या पक्षाची ही इच्छा आहे की ज्या कमतरतांवर जनतेने प्रश्न उपस्थित केले आहेत त्यावर चर्चा झाली पाहिजे आणि या कमतरता दूर केल्या पाहिजेत. आम्ही या योजनेच्या विरोधात आहोत असा भाग नाही. मात्र याबाबत चर्चा होऊन त्यानंतर त्याचं समाधानकारक उत्तर शोधलं गेलं पाहिजे असं के. सी. त्यागींनी म्हटलं आहे. अनेक राज्यांमध्ये अग्निवीर योजनेबाबत नाराजी आहे. त्यामुळे या योजनेचा पुनर्विचार झाला पाहिजे. असंही त्यागी म्हणाले.

अग्निवीरांसाठी दहावी शिक्षणाची अट असून यानंतर त्यांना चार वर्ष नोकरी करावी लागणार आहे. यामुळे अनेकांना पुढील शिक्षणाची चिंता सतावत आहे. यासाठी शालेय शिक्षण विभागाने नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ ओपन स्कूलच्या (NIOS) माध्यमातून १२ वी पर्यंत शिक्षण घेण्याचा पर्याय दिला आहे. यासाठी एनआयओएस काही महत्वाचे बदल करत आहे.

पान २ वर

अग्निपथमुळे सैन्यदलाच्या कार्यक्षमतेवर परिणाम होईल हा दावा केंद्राने फेटाळला आहे. अनेक देशात ही पद्धत अवलंबली जात असून जवानांसाठी सर्वोत्तम मानली गेली असल्याचंही सांगण्यात आलं आहे. अग्निवीरांना चार वर्षांनी सेवेत घेण्यापूर्वी तसंच मोठ्या पदांवर नियुक्ती करण्याआधी त्यांची पुन्हा एकदा चाचणी केली जाणार आहे.

पहिल्या वर्षी सैन्यदलात एकूण तीन टक्के अग्निवीर असतील. इतर ७५ टक्के अग्निवीर आपल्या आवडीनुसार करिअरचा पुढील मार्ग निवडू शकणार आहेत. सेवेत न घेतलेल्या प्रत्येक अग्निवीराला १२ लाखांची आर्थिक मदत मिळणार असून आयुष्यात नव्याने सुरुवात करण्याची संधी मिळणार आहे. अग्निवीरांना आर्थिक पॅकेज आणि बँकेचं कर्ज मिळेल असं केंद्राने स्पष्ट केलं आहे.

## जुन्या नाशकात मागील काही दिवसांपासून दूषित पाणीपुरवठ्याने आरोग्य धोक्यात



● नाशिक, सचिन कदम :

जुन्या नाशकात मागील काही दिवसांपासून दूषित पाण्याचा पुरवठा होत असून, त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. मनपा प्रशासनाला याबाबत कल्पना देऊनही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. दूषित पाणीपुरवठा थांबला नाही, तर मनपावर मोर्चा काढत जाब विचारला जाईल, असा इशारा काँग्रेस सेवादल शहराध्यक्ष डॉ. वसंत ठाकूर यांनी दिला आहे.

जुन्या नाशिकमधील पाटील गल्ली, बुधवार पेठ, संभाजी चौक, गजराज चौक, कुंभारवाडा, काझी गडी, नानावली, फकीरवाडी, कथडा, छपरीची तालीम, नाईकवाडी, चव्हाटा, पेठ म्हसरूळ टेक, तांबट लाइन या भागामध्ये सतत दूषित मातीमिश्रित पाणीपुरवठा होत आहे.

पान २ वर

स्मार्ट सिटीच्या नावाखाली जागोजागी खोदकाम करून पाण्याच्या पाइपलाइन फोडण्यात आल्या आहेत. त्यामुळे लाखो लिटर पाण्याची गळती सुरू आहे. दुसरीकडे कमी दाबाने पाणी नागरिकांना द्यायचे आणि तेही दूषित पाणीपुरवठा. हे थांबले पाहिजे. -- **डॉ. वसंत ठाकूर, शहराध्यक्ष, काँग्रेस सेवा दल**

## संपादकीय

# बांगलादेशी घुसखोरांचा विळखा

बांगलादेशच्या खासदाराची नुकतीच कोलकाता येथे हत्या झाली. तपासानंतर संबंधित हल्लेखोर हा बांगलादेशी घुसखोर असल्याचे निष्पन्न झाले. या घटनेमुळे पश्चिम बंगालमधील बांगलादेशी घुसखोरीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

बांगलादेशमधील समुद्री चाचे किंवा दरोडेखोरांनी भारतातील सुंदरबनमध्ये येऊन पश्चिम बंगालच्या वनविभागाच्या कर्मचाऱ्यांवरती हल्ला केला. यामध्ये एक कर्मचारी मारला गेला आणि चार गंभीररित्या जखमी झाले. अशा प्रकारचे बांगलादेशकडून होणारे हल्ले याआधी पण झाले होते. कारण, या भागामध्ये तस्करी म्हणजे स्मगलिंग मोठ्या प्रमाणामध्ये होते आणि या भागामध्ये कोस्टगार्ड किंवा नौदलाचे नामोनिशाण नाही. थोड्या संख्येने सागरी पोलीस आणि सीमा सुरक्षा दलाची वोटर विंग इथे तैनात आहे.

पश्चिम बंगालच्या किनारपट्टीवर शस्त्रास्त्रांची, दारूगोळ्याची तस्करी, घूसखोरी आणि इतर गुन्हेगारीमुळे किनार्यालगतचे महत्त्वाचे उद्योग, संरक्षण आस्थापनांना, सीमापारच्या अवैध हालचालींपासूनचा धोका आहे. शस्त्रे, स्फोटके, खोट्या नोटा ज्याचा वापर या भागात स्थायिक झालेले बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोर करतात. पूर्व मिदनापूर, दक्षिण 24- परगणा आणि उत्तर 24 परगणा, शेजारी देशास नद्यांनी व बंगालच्या उपसागराने जोडल्या गेलेल्या तीन जिल्ह्यांना मिळून 156 किमीहून अधिक किनारपट्टी लाभली आहे. ती सात पोलीस स्थानकांना सांभाळायची आहे. ती स्थानके कुठलीही आणीबाणी हाताळण्यास समर्थ नाहीत. पश्चिम बंगालमधील किनारपट्टीत बांगलादेशलगतचा सुंदरबन भागही समाविष्ट आहे. तेथील सागरी सुरक्षा सांभाळण्यात अनेक समस्या आहेत.


भारत आणि बांगलादेश यांदरम्यान 180 किमी सीमा पश्चिम बंगालमधील नद्यांचीच आहे. राज्य, जमिनीवरून आणि समुद्रमार्गे आलेल्या बांगलादेशी घुसखोरांनी भरून गेलेले आहे. आसाम अवैध बांगलादेशींना, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदपुस्तकाच्या आधारे हुडकून काढण्यात व्य असतानाच, पश्चिम बंगाल या समस्येवर स्वस्थ बसून होते. आज पश्चिम बंगालमध्ये 57 ते 60 लाख बांगलादेशी असावेत. सुंदरबन हा प्रदेश गंगा, मेघना आणि ब्रह्मपुत्रा या नद्या जेथे बंगालच्या उपसागरात मिळतात, तिथे निर्माण झालेला त्रिभुज प्रदेश आहे. यामधील 66 टक्के सुंदरबन बांगलादेशचा भाग आहे आणि 33 टक्के हा भारतात आहे.

असंख्य खाड्या, छोटी आखाते, छोट्या नद्या ही पश्चिम बंगाल किनारपट्टीची वैशिष्ट्ये आहेत. खाड्यांच्या सुरक्षा आणि देखरेखीकरता सीमा सुरक्षा दलाच्या जलशाखेची एक बटालिअन सहा तरल्या सीमाचौक्यांसह (बॉर्डर आउटपोस्टस) तैनात केलेल्या आहेत. यापैकी चार बॉर्डर आउटपोस्टस आघाडीवर तैनात आहेत, तर दोन आरक्षित ठेवलेल्या आहेत. या सीमाचौकी गस्तीनौकांच्या मदतीने संपूर्ण क्षेत्रावर नजर ठेवतात, जे अपुरे आहे.

मतदानाच्या दिवशी अनेक बांगलादेशी हे बांगलादेशची हद्दपार करून भारतात येतात आणि मतदान करतात. कारण त्यांच्याकडे भारताचे मतदान ओळखपत्र आहे. सरकारने मतदार ओळखपत्र आणि आधार हे जोडले गेले पाहिजे असा निर्णय घेतला आहे, ज्यामुळे एका माणसाला एकाच ठिकाणी मतदान करता येईल. दुर्दैवाने या निर्णयावरती अंमलबजावणी झालेली नाही, अजूनसुद्धा 40 टक्के मतदान ओळखपत्रे ही आधारशी जोडलेली नाहीत.

त्यामुळे अनेक बांगलादेशी हे दोन किंवा तीन ठिकाणी जाऊन मतदान करतात. आताच ममता बॅनर्जी यांनी एक असा आरोप केला होता की काही संस्था तृणमूल कॉंग्रेसच्या विरोधात काम करत आहे. सुंदरबन छुप्यारितीने अवैध शस्त्रास्त्रे, स्फोटके आणि तस्करीकृत सामान उतरवून घेण्याकरता, तसेच घुसखोरीकरता आदर्श ठरली.

पश्चिम बंगालमध्ये बांगलादेशींची संख्या सर्वाधिक आहे. काही बांगलादेशी खोट्या नोटांचा प्रसार करत असताना पकडले होते. बांगलादेशी घुसखोर सीमावरती भागामध्ये स्थायिक झालेले आहेत. त्यांचे अवैधरित्या राहणे कायदेशीर केले गेलेले आहे. घुसखोरांना शिधावाटपपत्रे प्राप्त झालेली आहेत, मतदारपत्रे मिळालेली आहेत किंवा गरिबीरिषेखालील असल्याबाबतचे प्रमाणपत्रही लाभलेले आहे. त्यांच्या आधारे ते सरकारी लाभ उपभोगत आहेत. निवडणुकांच्या आधी जास्त केंद्रीय सुरक्षा दलांना तैनात करून पश्चिम बंगालमधील हिंसाचार आणि निवडणुकांमध्ये होणारी फसवणूक ही थांबवलीच पाहिजे. निवडणुकानंतर नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टरचा वापर करून अवैध बांगलादेशींना शोधले पाहिजे आणि त्यांना बांगलादेशमध्ये परत पाठवले पाहिजे.



## आजची चित्रोळी

दुधास राखण मांजर बसले
विश्वासाचा होईल घात !
थंड होईतो करेल राखण
लक्ष नसतां मारील हात !!

मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई

## पान १ वरून...

### कोल्हापुरात नवीन राजवाड्यात...

पोवाडा, शौर्य गीत, मराठी स्फूर्ती गीत, करवीर झंजपथक, मर्दानी खेळांचा थरार अनुभवायला मिळाला. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते माजी खासदार राजू शेट्टी, मराठा महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष वसंतराव मुळीक आदी उपस्थित होते. पारंपरिक ढोल ताशांच्या गजरात जुना राजवाडा येथे शिवराज्याभिषेक दिन झाला. लोकसभा निवडणुकीत शाहू छत्रपती विजयी झाल्यानंतरचा हा पहिलाच राज्याभिषेक सोहळा असल्याने उत्साह पाहायला मिळाला.

### रुंदीकरण केलेल्या ठाण्यातील रेल्वे...

बहुतांशी प्रवाशांचे बूट चामड्याचे असतात. त्यांना या पाण्यातून जाताना काळजी घ्यावी लागत होती. फलाटावरील साचलेले पाणी बाहेर जाण्यासाठी वाट नसल्याने ते फलाटावर तुंबून होते. लोकल आली की प्रवासी या पाण्यातून उड्या मारत जात असल्याने आजुबाजुच्या प्रवाशांच्या कपड्यांवर हे पाणी उडत आहे. अनेक प्रवासी या पाण्यात पाय घसरून पडत होते. या नवीन कामाचा हा नवीन ताप पाहून प्रवासी संतप्त होत होते.

त्यामुळे फलाट क्रमांक पाचवर मुसळधार पाऊस सुरू होण्यापूर्वी छप्पर बसविण्याचे आणि फलाटावर पावसामुळे तुंबणारे पाणी वाहून जाईल यासाठी व्यवस्था करावी,अशी मागणी प्रवासी करत आहेत.

### मुंबईकरांनो 'या' दिवसांत समुद्रावर जायचे...

या हाय-टाइटच्या काळात मुंबईकरांनी समुद्र किनाऱ्यावर जाऊ नये, असं आवाहन महापालिकेने केलं आहे.

दरम्यान, हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार मुंबईसह महाराष्ट्रात 10 जूनपर्यंत मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे. मात्र, त्यापूर्वी पुण्यात मान्सूनपूर्व पाऊस बरसला. वडगाव शेरीमध्ये एका तासात तब्बल 114 मिमी पाऊस झाला होता. शहरात इतर ठिकाणी देखील पावसानं झोडपलं अनेक ठिकाणी रस्त्यांना ओढ्या नाल्याचं स्वरूप आलं होतं. मतमोजणी केंद्र देखील गुडघा 1भर पाण्याने वेढल गेलं होतं. रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर पाणी साचलं होतं

विदर्भात पावसाचा येलो अलर्ट

विदर्भात पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. नागपूर सह संपूर्ण विदर्भात पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. आजपासून पुढील चार दिवस मेघगर्जनेसह वादळी पावसाचा अंदाज नागपूर प्रादेशिक हवामान विभागाने दिला आहे. मेच्या अखेरच्या आठवड्यात चांगलेच होरपळून काढल्यानंतर गेल्या काही दिवसांपासून तापमानात घट झाल्यानंतर आता मान्सून पूर्व पावसाकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

### नवी मुंबई आर्थिक केंद्रापुढे पाणथळींसह...

पूर्वी सेझ म्हणून ओळखले जाणारे हे क्षेत्र आता नवी मुंबई एकात्मिक औद्योगिक प्राधिकरण म्हणून ओळखले जाते. आता ४ जून २०२४ रोजी त्याच्या क्षेत्रावर आर्थिक केंद्र विकसित करण्यासाठी रिलायन्स समूहाने नवी मुंबई एकात्मिक औद्योगिक प्राधिकरणासोबत नवा भाडेतत्त्वावर करार केला आहे. यात सिडको २६ टक्के भागधारक आहे.

आता नव्या आर्थिक केंद्राबाबत नॅट कनेक्ट फाउंडेशन आणि सागर शक्ती संस्थेने गुरुवारी केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान नियंत्रण मंत्रालय आणि राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे ई-मेलद्वारे तक्रार केली होती. तिला मुख्यमंत्री कार्यालयाने एका तासाच्या आत उत्तर देऊन याबाबत राज्याचे पर्यावरण आणि हवामान बदल विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांना चौकशी करून पुढील कार्यवाही करण्यास सांगितले आहे.

खरे तर संपूर्ण द्रोणागिरी नोड ही भरती पातळीच्या तीन मीटर खाली असल्याचे सिडकोने स्वतः मान्य केले आहे. असे असतानाही पाणजे येथील २८९ हेक्टर आंतरभरतीयुक्त पाणथळ जमिनीसह सहा होल्डिंग तलाव नवी मुंबई एकात्मिक औद्योगिक प्राधिकरणास लीजवर देण्यात आले आहेत. सिडकोने विकास आराखड्यात हे क्षेत्र नवी मुंबई सेझ अंतर्गत सेक्टर १६ ते २७ म्हणून दर्शविल्याने पाणजे पाणथळीला मोठा धोका निर्माण झाला आहे. सिडकोची ही चूक अनेकदा सरकारच्या निदर्शनास आणून दिली असल्याचे नॅट कनेक्टचे संचालक बी.एन. कुमार यांनी सांगितले. सागर शक्तीचे नंदकुमार पवार यांनीही याबाबत चिंता व्यक्त केली आहे.

### खासदार होताच बाळ्या मामा ॲक्शन...

या अनधिकृत बांधकामासाठी माजी खासदार कपिल पाटील व त्यांचा पुतण्या देवेश पाटील यांच्या नावाने हे बांधकाम व्यावसायिक येथील शेतकरी व नागरिकांना धमकावत जमिनींवर अतिक्रमण केले असून येथील स्थानिक गुंडांना हाताशी धरून बांधकाम व्यावसायिक जनतेची फसवणूक करत आहेत असा आरोप खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळया मामा यांनी यावेळी केला आहे.या प्रकरणी आपण स्वतः एमएमआरडीए,तहसीलदार व प्रांत तसेच जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करणार असून या प्रकाराची सर्व कागदपत्र आपण शासकीय यंत्रणेला सोपविणार आहोत असेही बाळया मामा यांनी यावेळी सांगितले.

येथील बांधकाम व्यावसायिक जमिनीचे खोटे कागदपत्र दाखवून इन्व्हेस्टर लोकांना व सामान्य घर खरेदी करणाऱ्या नागरिकांना फसवत असून दादागिरी व दहशत वाढवली आऊन आज शेतकऱ्यांच्या आग्रहाखातर मी इथे येऊन पाहणी केली असून मी शेतकऱ्यांना शब्द डिंक होता की मी निवडून आलो की दुसऱ्याच दिवशी या जागेची पाहणी करणार व तिसऱ्या दिवशी तक्रार करून जनतेला न्याय देणार असल्याचे सांगितले असल्याने आज व्यस्त कार्यक्रम आटोपते घेऊन आज मी या ठिकाणी अनधिकृत बांधकामांची पाहणी केली असल्याचेही खासदार सुरेश म्हात्रे यांनी यावेळी सांगितले असून केवळ केंद्रीय मंत्र्यांच्या आशीर्वादाने शासकीय यंत्रणा या अनधिकृत बांधकामांवर दुर्लक्ष करत आले आहेत मात्र आता असा गैरप्रकार खपवून घेतला जाणार नाही असा इशारा देखील बाळया मामा यांनी दिला आहे.

### 'आरटीई' घोटाळा : शाहिदचा भाऊ राजाला...

तपासात दोघांनीही आरटीई कार्यकर्ता असल्याची बतावणी करणाऱ्या शाहिद शरीफच्या माध्यमातून मुलांना नामांकित शाळेत प्रवेश मिळविल्याचे समोर आले. पोलिसांनी दोघांनाही अटक केली, मात्र शाहिद फरार झाला. पोलिसांनी त्याच्या कार्यालयात काम करणाऱ्या रुखसार चांद सय्यद उर्फ रुपाली धमगाये हिला अटक केली होती. पोलीस आयुक्तांनी प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी एसआयटी स्थापन केली. एसआयटीच्या तपासात शाहिदसाठी ग्राहक आणण्याचे काम त्याचा लहान भाऊ राजा शरीफ करीत होता, अशी माहिती मिळाली.

आता पोलीस राजाशी संबंधित लोकांवरही फास आवळण्याची तयारी करीत आहेत. पोलिसांना संशय आहे की, राजाचे साथीदारही शाहिदला फरार राहण्यात मदत करीत आहेत. ही कारवाई पोलीस उपायुक्त राहुल मदने आणि सहायक आयुक्त माधुरी बाविस्कर यांच्या मार्गदर्शनात सदर ठाण्याचे ठाणेदार मनीष ठाकरे, विजया म्हेत्रे व त्यांच्या पथकाने केली.

### विद्युत वाहिनीच्या धक्क्याने सफाई कर्मचारी...

बेजबाबदारपणाचा दुसरा बळी

गेल्या महिन्यात हडपसर भागात पाऊस झाला. त्यावेळी तेथे साचलेल्या पाण्यात विद्युत प्रवाह उतरला होता. साचलेल्या पाण्यातून निघालेल्या शाळकरी मुलाचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला होता. बालेवाडी भागात उघड्यावर पडलेल्या विद्युत वाहिनीतून विजेचा धक्का बसल्याने चंद्रकला मिरदुडे यांचा मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी घडली. महावितरणच्या बेजबाबदारपणामुळे दुर्घटना घडल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

### महाराष्ट्र सदन प्रकरणातील...

उलट विक्री करावयाचा मोक्याचा भूखंड अदानी समुहाला विकसित करण्यासाठी संबंधित विकासकाने दिला आहे. याबाबत आता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण मूग गिळून गप्प आहे.

या योजनेत मे. चमणकर इंटरप्राईझेसने १५१ झोपडीवासीयांसह काही विक्री करावयाच्या अनिवासी सदनिकांची इमारत बांधली होती. या इमारतीला २००७ मध्ये निवासयोग्य प्रमाणपत्र मिळाले होते. १५१ पैकी ७२ निवासी तर उर्वरित सर्व अनिवासी झोपडीधारक आहेत. या सर्वांना २२५ चौरस फूटाचे क्षेत्रफळ देण्यात आले होते.

ही इमारत पाडून त्याजागी नव्या इमारतीत नव्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार ३०० चौरस फुटाची घरे बांधून त्या बदल्यात अतिरिक्त चटईक्षेत्रफळाचा लाभ खुल्या विक्रीसाठी विकासकाला मिळणार आहे. नियमावलीनुसार, विकासक अशी इमारत पाडून नव्या इमारतीत ३०० चौरस फुटाचे घर देऊ शकतो. मात्र यासाठी संबंधित झोपडीवासीयांची संमती बंधनकारक आहे. या प्रकरणात विकासकाने संमती सादर केली असली तरी संमती देणाऱ्यांपैकी ८० टक्के हे मूळ झोपडीवासीय नाहीत. तरीही प्राधिकरणाने ही इमारत पाडण्यास मान्यता दिली आहे, असा आरोप ही इमारत बांधणारे मे. चमणकर इंटरप्राईझेसचे प्रसन्ना चमणकर यांनी केला आहे.

ही इमारत धोकादायक असल्याचे प्रमाणपत्र महापालिकेने दिले आहे. शिवाय एकाच अभिन्यासात एक इमारत जुनी व इतर इमारती नव्या, हे योग्य वाटत नाही. त्यामुळे नव्या इमारतीत झोपडीवासीयांना मोठी घरे मिळतील. विकासकाने ती बांधून देण्याचे आश्वासन दिले आहे, याकडे प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र कल्याणकर यांनी लक्ष वेधले.

या इमारतीतील मूळ झोपडीवासीय घरे विकून गेले आहेत. ८० टक्के झोपडीवासीय नवे आहेत. याबात आक्षेप घेतल्यानंतर प्राधिकरणाने विकासकाकडून खुलासा मागवत कुठलेही बेकायदेशीर कृत्य करु नये, असे स्पष्ट केले होते. मात्र आता प्राधिकरणाने आपल्याच पत्राला बगल देत ही इमारत पाडून नवी इमारत बांधण्यास विकासकाला हिरवा कंदिल दिला आहे


### सरकार स्थापनेच्या आधी जदयूच्या मागण्या...

चार वर्षांच्या कालावधीसाठी (प्रशिक्षण काळासह) तरुणांना समाविष्ट केलं जाईल. महिन्याला ३० ते ४० हजार रुपये वेतन (लागू असल्यास स्वतंत्र भत्ता) मिळणार आहे. वेतनात दर वर्षी काहीअंशी वाढ होईल. प्रत्येक अग्निवीरास मासिक वेतनातील ३० टक्के रक्कम अग्निवीर समूह निधीत द्यावी लागेल. यातून कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर त्यांना सेवा निधी अंतर्गत ११.७१ लाख रुपये मिळतील, जे करमुक्त असतील. मात्र या सगळ्या प्रकरणी केंद्र सरकारने फेरविचार करावा असं जदयूने म्हटलं आहे

### जुन्या नाशकात मागील काही दिवसांपासून...

आधीच कमी दाबाने पाणीपुरवठा होत असताना त्यातही दूषित गढूळ पाण्यामुळे नागरिक हैराण झाले आहे. वरील भागात अनेक ठिकाणी लहान मुलं व वयोवृद्ध नागरिक आजारी पडले आहेत. लहान मुलांमध्ये कॉलरा, डायरिया याची साथ पाहायला मिळत आहे. दूषित पाणीपुरवठा त्वरित थांबवावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा सेवा दलामार्फत देण्यात आला.

# उसरघर येथिल मंड पंजाबी ढाबा तळीरामांचे श्रध्दा स्थान






## विनापरवाना जेवणाच्या व्यवस्थे आड दिले जाते तळीरामांना दारू पिण्यासाठी मुबा

माणगांव - मौजे उसरघर, दारू विक्रीसाठी परवानाधारक दुकानाची गरज आहे की नाही, हा प्रश्ण पडतो. पैसे जास्त दिले की, कोणत्याही हॉटेलमध्ये अथवा ढाब्यावर हल्ली सहजरीत्या दारू उपलब्ध होत आहे. पण ढाब्यांवर दारू प्यायल्यावर बेड्या पडणार असून चालकाला लाखोंचा दंड होणार आहे, परंतू ही कारवाई रायगड जिल्ह्यातील राज्य व राष्ट्रीय महामार्गावर केव्हा होणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभाग किंवा रायगड पोलिसांनी ढाबा चालकांवर कोणतीही मोठी कारवाई केली नाही. कोरोना काळ वगळता या ढाब्यांवर एकही कारवाई झालेली नाही. त्यामुळे राज्य व राष्ट्रीय महामार्गावरील ढाब्यांवर बेधडक पणे जेवणाचे निमित्ताने दारू पिण्यास मुबा दिली जाते. त्यामुळे कुठेही, कधीही दारू सहजरित्या प्यायला मिळत आहे व दारू विक्रीसाठी किंवा दारू पिण्यास बसविण्याकरिता परवानाधारक दुकानाची गरज आहे की नाही, हा प्रश्ण पडतो. पैसे जास्त दिले की, कोणत्याही ढाब्यावर अथवा हॉटेलमध्ये सहजरीत्या दारू पिण्यास जागा उपलब्ध होत आहे. पण ढाब्यांवर दारू प्यायल्यावर बेड्या पडणार असून चालकाला लाखोंचा दंड होणार आहे, पण ही कारवाई रायगड जिल्ह्यातील राज्य व राष्ट्रीय महामार्गावर केव्हा होणार?

"ढाबा चालकांवर कारवाई करणार कोण?" महामार्गावरील अनेक ढाब्यांवर रात्रीच्या वेळी दारूची विक्री लपूनछपून केली जाते, तर काही ठिकाणी बसून दारू पिण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात येते. पण याकडे राज्य उत्पादन शुल्क विभाग कानाडोळा करतात. या ढाब्यांवर स्थानिक पोलीसही कारवाई करीत नाही.

"कोरोनाच्या काळात सर्रास ढाब्यांवर कारवाई!" ढाब्यांवर दारू पार्ट्या करण्यास परवानगी देणाऱ्या चालकांवर व रायगड जिल्ह्यातील अनेक ढाब्यांवर जिल्हा पोलिसांच्या पथकांतर्फे आजवर बऱ्याचदा कारवाई करण्यात आली आहे. परंतु अलीकडे अवैधरित्या दारू पिण्यास व्यवस्था करून देण्याची पद्धत ढाब्यांवर जोमात सुरू आहे आणि तरीसुद्धा कोणत्याच ढाब्यावर कारवाई झाली नसल्याचे कळते.

उसरघर येथे असलेला मंड ढाबा यासाठी अत्यंत लोकप्रिय आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ लगत असलेल्या या ढाब्यावर कायम तळीरामांची गर्दी पाहायला मिळते.

# सर्वांनाच खुश करणारा लोकसभेचा निकाल !

लोकसभा निवडणूक पार पडून निकाल समोर आला आहे ज्यामध्ये भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले नसले, तरी एनडीएने बहुमताचा आकडा पार केल्याने एनडीएचे नेते नरेंद्र मोदी पुन्हा एकदा पंतप्रधानपदी आरूढ होणार हे निश्चित झाले आहे. दुसरीकडे इंडिया आघाडीने यंदाच्या निवडणुकीत जोरदार मुसंडी मारून आपणही कच्चे लिंबू नसल्याचे दाखवून दिले आहे. निकालानंतर सत्तेसाठी हातपाय हलवण्याच्या तयारीत असलेल्या इंडिया आघाडीने सर्व घटक पक्षांसोबत चर्चा करून अखेर विरोधी बाकावर बसण्याचा निर्णय सर्वानुमते घेतला आहे. त्यामुळे देशात कुठेही संघर्षाचे वातावरण दिसून येत नाही. निवडणुकीचा निकाल जाहीर झाला आणि दुसऱ्याच दिवशी एक मजेशीर पोस्ट वाचनात आली. जी फॉरवर्ड केल्यावर वाचणाऱ्या प्रत्येकाच्या चेहऱ्यावर हसू उमटत असल्याचे लक्षात आले. या पोस्टनुसार यंदाच्या निवडणुकीचा निकाल अत्यंत अभूतपूर्व आहे जो यापूर्वी कधीही कोणीही अनुभवला नव्हता. देशाच्या स्वातंत्र्यानंतर असा पहिला निकाल आहे जो जाहीर झाल्यानंतर सर्वच जण खुश आहेत. भाजप खुश आहे कारण सर्वाधिक जागा मिळाल्याने तो एनडीए गठबंधनासोबत सत्ता स्थापन करणार आहे. सलग तिसऱ्यांदा सत्तास्थानी बसणार आहे. विरोधी पक्ष असलेली कॉंग्रेस पण खुश आहे कारण मागील लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत यंदा त्यांनी उत्तम कामगिरी करत मागच्या लोकसभेपेक्षा ४७ अधिक जागा मिळवून शंभरीच्या जवळ पोहोचण्यात यश मिळवले आहे. विरोधकांनी जनमानसांत केलेल्या बदनामीनंतरही कॉंग्रेसला मिळालेले यश कॉंग्रेसला अत्यंत सुखावत आहे. समाजवादी पक्ष आणि राष्ट्रीय जनता दल दोघेही खुश आहेत कारण मागील लोकसभा निवडणुकीत सपशेल अपयशी ठरलेले हे दोन्ही पक्ष यंदा जनमताच्या बळावर जोरदार मुसंडी मारत पुन्हा पूर्वपदावर आले आहेत. शरद पवार यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना दोन्हीही पक्ष खुश आहेत कारण सत्ताधारी पक्षाने फोडाफोडीचे राजकारण केले असले तरी राज्यातील जनमताचा कौल अद्याप आपल्याकडेच आहे हे दाखवण्यात ते यशस्वी झाले आहेत. येत्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोघांना मिळालेले यश राज्यात सत्ता मिळवण्याच्या दृष्टीने ऊर्जा देणारे आहे. तृणमूल कॉंग्रेस पार्टी खुश आहे कारण भाजपच्या झंजावातासमोरही त्यांनी आपले अस्तित्व डगमगू दिले नाही. उलट मागच्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत यंदा अधिक जागा मिळवण्यात त्यांना यश मिळाले आहे. राज्यातील जनता अजूनही आपल्या बाजूने आहे याबाबत ते समाधानी आहेत. राष्ट्रीय स्तरावरील प्रमुख प्रक्षांसह राज्यातील पक्षही खुश असल्याने त्यांचे कार्यकर्ते, त्यांना मानणारी जनताही आज खुश आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे निवडणूक आयोगही यंदाच्या निकालानंतर खुश आहे कारण ईव्हीएम मशिन्सवर निवडणूका सुरु झाल्यानंतरची ही पहिली निवडणूक आहे, जिच्या निकालानंतर कोणीही ईव्हीएम मशीन्सना दोष दिलेला नाही किंवा संशय व्यक्त केलेला नाही. असा हा लोकसभेचा निकाल सर्वांनाच सुखावह ठरल्याने यंदा निकालानंतर कुठेही उल्लेखनीय अशी अनुचित घटना घडलेली नाही किंवा निकालानंतर सामाजिक शांतता बिघडेल अशी परिस्थिती निर्माण झालेली नाही ज्यामुळे देशाची अंतर्गत सुरक्षा यंत्रणा, पोलीस प्रशासनही खुश आहेत. सर्वांनाच खुश करणारी यंदाची लोकसभा निवडणूक लोकांच्या कायमच स्मरणात राहील.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# आंब्याच्या कोयी संकलन (गुठली रिटर्न्स) उपक्रमाला नागरिकांचा उत्साही प्रतिसाद

● नवी मुंबई - नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आंब्याच्या कोयी (Mango Seeds) संकलनाची विशेष मोहीम हाती घेण्यात आली असून कोयी संकलनासाठी तयार करण्यात आलेल्या विशेष वाहनात 12 हजाराहून अधिक कोयी जमा झालेल्या आहेत.

नवी मुंबई महानगरपालिकेने आंब्याच्या सुकलेल्या कोयी जमा करण्याचे आवाहन केल्यापासून हा अत्यंत आगळावेगळा उपक्रम असल्याच्या प्रतिक्रिया नागरिकांकडून विविध माध्यमांतून प्राप्त झाल्या असून विशेष वाहनात कोयी जमा करण्यातही नागरिकांचा उत्साह दिसून येत आहे.

अशाच प्रकारचा 'गुठली रिटर्न्स' हा उपक्रम 'रेड एफएम' यांच्या वतीने मोठ्या प्रमाणावर राबविला जात असून त्यांच्याकडे संकलित होणा-या कोयी ते शेतक-यांपर्यंत आंबा रोप लागवडीसाठी पोहचवून त्यांना उदरनिर्वाहाचे पर्यायी




साधन उपलब्ध करून देत आहेत. नवी मुंबई महानगरपालिकेकडे मोठ्या प्रमाणावर कोयी संकलित होणार असल्याने त्यामधील कोयीतून तयार होणारी काही वृक्षरोपे नवी मुंबईच्या आम्रवृक्ष संवर्धनासाठी ठेवून उर्वरित साधारणत: 1 लाख संकलित कोयी रेड एफएमच्या 'गुठली रिर्टन्स' या पर्यावरण संवर्धक उपक्रमासाठी दिल्या जाणार आहेत.

आजच जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून रेड - एफएम वाहिनीवरून गुठली रिटर्न उपक्रमाबाबत आरजे मलिष्का यांनी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्याशी केलेल्या संवादाचे थेट प्रसारण रेड - एफएम वाहिनीव्दारे करण्यात आले आहे. या उपक्रमात नवी मुंबई महानगरपालिकेने पर्यावरणपूरक दृष्टीकोन ठेवून सहकार्याची भूमिका ठेवल्याबद्दल रेड एफएम वाहिनीव्दारे स्वागत करण्यात आले आहे तसेच रेड - एफएम वाहिनीच्या श्रोत्यांनीही प्रशंसा केली आहे.

नवी मुंबईतील सोसायट्यांमधून तसेच ज्युस सेंटर्स, रेस्टॉरंट्स व हॉटेल्स अशा ठिकाणांहून या आंब्याच्या कोयी संकलित करण्यासाठी दोन परिमंडळांसाठी स्वतंत्र वाहन तयार करण्यात आले असून कोयी संकलन मोहीम व्यापक प्रमाणात राबविण्यास सुरूवात करण्यात आलेली आहे. जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून सुरू करण्यात आलेला हा उपक्रम पुढील काही दिवस असाच सुरू राहणार आहे.

तरी नागरिकांनी आंब्याचा आस्वाद घेऊन झाल्यानंतर कोयी ओल्या कच-यात न टाकता एखाद्या भांड्यात स्वच्छ धुवून घ्याव्यात व उन्हात सुकवाव्यात आणि नवी मुंबई महानगरपालिकेच्या विशेष वाहनात वर्तमानपत्रे अथवा बॉक्समध्ये पॅक करून द्याव्यात असे आवाहन करण्यात येत आहे.

# डोंबिवलीतील अमुदान कंपनी स्फोटातून दोन मृतदेहांची ओळख बारा दिवसांनी पटली

● डोंबिवली - डोंबिवली एमआयडीसीतील सोनारपाडा येथील अमुदान कंपनी स्फोटात जळून खाक झालेल्या दोन मृतदेहांची ओळख बारा दिवसांनी पटली आहे. नातेवाईकांच्या डीएनए चाचणीवरून ही ओळख पटविण्यात आली आहे. विशाल पौडवाल (४०), मनीष दास (२२) अशी ओळख पटलेल्या कंपनी कामगारांची नावे आहेत.

अमुदान कंपनीत स्फोट झाल्यानंतर ते मागील बारा दिवसांपासून बेपत्ता होते. या स्फोटातील मृतदेह पालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात ठेवण्यात आले आहेत. या मृतदेहांचा कोळसा झाला असल्याने त्यांची ओळख पटविणे अवघड झाले आहे. समोर मृतदेह आहेत पण तो आपल्या नातेवाईकाचा आहे हे कसे समजायचे असे प्रश्न कुटुंबीयांना पडले आहेत. जोपर्यंत आपल्या मयत कामगाराची ओळख पटत नाहीत तोपर्यंत नातेवाईक पोलीस ठाण्यात, पालिका रुग्णालयात



फेऱ्या मारत आहेत.

स्फोट झाल्यानंतर अनेक मृतदेहांची ओळख पटली नाही. पालिका रुग्णालयात ज्या नातेवाईकांचे कामगार बेपत्ता आहेत. त्यांचे रक्ताचे नमुने घेऊन ते डीएनए चाचणीसाठी फोरेन्सिक प्रयोगशाळेत पाठविले होते. असे नुमने घेतलेल्या विशाल पौडवाल, मनीष दास यांचे त्यांच्या कुटुंबीयांबरोबरच्या रक्ताचे नमुने जुळले आहेत, अशी माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिली. यासंदर्भातची माहिती कल्याण पोलिसांनी या दोन्ही कुटुंबीयांना देण्यात आली. पौडवाल, दास यांचे मृतदेह त्यांच्या कुटुंबीयांच्या ताब्यात अंत्यविधीसाठी देण्यात आले. पालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपा शुक्ला यांनी डीएनए चाचणीवरून दोन मृतदेहांची ओळख पटली असल्याचे सांगितले. विशाल पौडवाल हे बदलापूर येथे पत्नी आणि आपल्या आठ वर्षाच्या मुलासह राहत होते. ते अमुदान कंपनी लगतच्या कॉसमॉस कंपनीत ग्राफिक डिझायनर म्हणून काम करत होते. मनीष दास हेही कॉसमॉस कंपनीत गेल्या महिन्यापासून कामाला होते.

या स्फोटात रोहिणी कदम (२६), रिध्दी खानविलकर (३८), राकेश राजपूत (२७) हे मरण पावले होते.

# कल्याण मध्ये इलेक्ट्रिक स्कुटीला लागलेल्या आगीत स्कुटी जळून खाक



● कल्याण : कल्याण पश्चिमेतील टिळक चौक परिसरात पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या एका इलेक्ट्रिक स्कूटीला आग लागल्याची घटना आज दुपारी साडेबारच्या दरम्यान घडली. टिळक चौक येथील कल्याण जनता सहकारी बँकेसमोर हा प्रकार घडला. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाने तात्काळ धाव घेत ही आग विझवली. आगीचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट असून या आगीमध्ये गाडीचा अक्षरशः कोळसा झाला आहे.

# कल्याण परिमंडळात नवीन वीज जोडणीची 'झिरो पेन्डन्सी; एकाच दिवसात १३६९ कनेक्शन

## महावितरणचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

● ठाणे - महावितरणचा वर्धापन दिन कल्याण परिमंडलात गुरुवारी (०६ जून) मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. वर्धापन दिनानिमित्त नवीन वीजजोडणीचा एकही अर्ज प्रलंबित न ठेवण्याचे निर्देश मुख्य अभियंता धनंजय औंढेकर यांनी दिले. त्यानुसार कल्याण परिमंडलात सर्व पात्र अर्जांवर कार्यवाही करून बुधवारी एकाच दिवसात तातडीने १३६९ नवीन वीजजोडण्या देत 'झिरो पेन्डन्सी'चे लक्ष्य साध्य करण्यात आले.

कल्याण परिमंडलात एकूण १२३२ सिंगल फेज तर थ्री-फेजच्या १३७ वीज जोडण्या बुधवारी एकाच दिवशी कार्यान्वित करण्यात आल्या. यात कल्याण मंडल कार्यालय एक अंतर्गत कल्याण पूर्व, पश्चिम व डोंबिवली विभागात सिंगल फेजच्या २७८ आणि थ्री फेजच्या ५७ वीजजोडण्या देण्यात आल्या. कल्याण मंडल कार्यालय दोनमधील उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर, मुरबाड, शहापूर भागात सिंगल फेजच्या ३३२ आणि थ्री फेजच्या ३५ वीजजोडण्या देण्यात आल्या. वसई मंडल कार्यालयांतर्गत वसई, विरार, वाडा, नालासोपारा, आचोळे परिसरात सिंगल फेजच्या सर्वाधिक ४१० आणि थ्री फेजच्या २४ वीजजोडण्या कार्यान्वित करण्यात आल्या. तर पालघर मंडल कार्यालयातील पालघर, बोईसर, डहाणू, जव्हार, मोखाडा, विक्रमगड परिसरात सिंगल फेजच्या २१२ आणि थ्री फेजच्या २१ वीजजोडण्या देण्यात आल्या. या कामगिरीबद्दल मुख्य अभियंता औंढेकर यांनी अधिकारी, अभियंते व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.

वर्धापन दिनानिमित्त कल्याण मंडल एक आणि मंडल दोन कार्यालयांचा एकत्रित कार्यक्रम डोंबिवली पूर्वेतील सावित्रीबाई फुले नाट्यगृहात गुरुवारी सांयकाळी चार वाजता 'यदा कदाचित रिटर्न्स' या विनोदी नाटकाचे आयोजन करण्यात



आले आहे. तर वसई आणि पालघर मंडल कार्यालयांच्या वतीने वसई व पालघरमध्ये स्वतंत्र कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# विधानसभेत काँग्रेस पक्ष मोठ्या ताकदीने उतरणार - प्रवक्ते राकेश शेट्टी

● घाटकोपर - निवडणुकीत काँग्रेस पक्षाला मोठे यश मिळाले. काँग्रेस राज्यात सर्वात मोठा पक्ष ठरल्याने कार्यकर्त्यात देखील उत्साह पसरला आहे. काँग्रेसचे प्रवक्ते राकेश शेट्टी यांनी नुकतीच नवी दिल्ली येथे अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस आणि महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्निथला यांची भेट घेतली आणि त्यांना पुष्पगुच्छ देऊन महाराष्ट्रात



झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या 13 खासदारांच्या विजयाबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. त्याच्या नेतृत्वाखाली 2019 च्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात फक्त एकच खासदार निवडून आला होता, तर यावेळी महाराष्ट्रात काँग्रेसचे 13 खासदार विजयी झाले आहेत. तर आगामी राज्यातील होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत देखील काँग्रेस पक्ष मोठ्या ताकदीने उतरणार असल्याचे प्रवक्ते राकेश शेट्टी यांनी सांगितले

# वापरलेल्या आणि सुस्थितीत असलेल्या वस्तू ठाणेकरांनी 'आरआरआर' केंद्रांवर द्याव्यात!

- महापालिका मुख्यालयातील केंद्राचे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले उद्घाटन
- ठाण्यात १० ठिकाणी 'ट्रिपल आर' केंद्रे सुरू
- 'रिड्युस, रीयुज आणि रिसायकल' हा नवीन काळाचा मंत्र
- पुस्तके, जुनी खेळणी, कपडे, इ-कचरा देता येणार

● ठाणे : ठाणेकर नागरिकांना त्यांच्याकडील आता वापरात नसलेल्या पण टीकाऊ आणि पुन्हा वापरता येतील अशा वस्तू दान करता याव्यात यासाठी ठाणे महापालिकेने मुख्यालय आणि प्रभाग समिती कार्यालये अशा १० ठिकाणी 'आरआरआर' केंद्रे सुरू केली आहेत. जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून महापालिका मुख्यालयातील या केंद्राचे उद्घाटन महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते झाले.

वापरण्यायोग्य चांगल्या वस्तू स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून गरजूंपर्यंत पोहोचवण्यात येणार आहेत. त्यामुळे ठाणेकर नागरिकांनी या मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन जास्तीत जास्त चांगल्या वस्तू दान कराव्यात, असे आवाहन महापालिका आयुक्त राव यांनी केले आहे. या उद्घाटन प्रसंगी, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) तुषार पवार, मुख्य लेखा वित्त अधिकारी दिलीप



सूर्यवंशी, मुख्य लेखा परिक्षक संजय पतंगे, सहाय्यक आयुक्त महेश आहेर, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे आदी उपस्थित होते.

स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अंतर्गत 'शून्य कचरा संकल्पने'कडे महापालिकेची वाटचाल सुरू आहे. शहर स्वच्छ आणि सुंदर दिसावे, त्यातून नागरिकांचे आरोग्य उत्तम व्हावे हा उद्देश आहे. घरात पडून असलेल्या पण वापरता येण्याजोग्या चांगल्या वस्तू गरजूंच्या उपयोगी पडू शकतील. या उद्देशाने, पुस्तके, जुनी खेळणी, कपडे, इ-कचरा गोळा करण्यासाठी 'आरआरआर' म्हणजेच, माफक वापर (रिड्यूस), पुर्नवापर (रीयूज), परिवर्तन करून पुर्नवापर (रिसायकल) ही संकल्पना राबविण्यात येत आहे.

# घोडबंदर मार्ग ठप्प; घाटरस्त्याच्या कामामुळे वाहनांच्या रांगा

● ठाणे : ठाणे आणि मुंबई अहमदबाद मार्गांना जोडणाऱ्या घोडबंदर मार्गिकेच्या दुरुस्तीचे काम मागील काही दिवसांपासून सुरू आहे. बंदी असतानाही अवजड वाहनांची भरदिवसा घुसखोरी सुरू असल्याने त्याचा परिणाम गुरुवारी वाहतुक व्यवस्थेवर झाला. सकाळपासून या मार्गावर वाहनांच्या गायमुख ते वाघबीळ पर्यंत रांगा लागल्या आहेत. त्यामुळे बोरीवली, वसईच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या चालकांचे हाल होत आहेत. अवजड वाहनांची वाहतुक सुरू असल्याने प्रवाशांकडून संताप व्यक्त केला जात आहे.



घोडबंदर मार्गावर पावसाळयात खड्डे पडत असतात. त्यामुळे येथील घाट रस्त्याच्या तात्पुरत्या स्वरूपात डागडुजीची कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून केली जात आहे. घोडबंदर मार्ग हा ठाणे तसेच मुंबई अहमदाबाद मार्गाला जोडतो. उरण येथील जेएनपीटी येथून जाणारी हजारो अवजड वाहने घोडबंदर मार्गे वसई किंवा गुजरातच्या दिशेने ये-जा करत असतात. राज्य परिवहन मंडळाच्या बसगाड्या (एसटी), महापालिका परिवहन विभागाच्या बसगाड्यांसह हलक्या वाहनांची वाहतुक येथून मोठ्याप्रमाणात होत असते. येथील दुरुस्ती कामामुळे वाहन चालकांना दररोज कोंडीचा मन:स्ताप सहन करावा लागतो. गुरुवारी घोडबंदर मार्गावर गायमुख घाट, कासारवडवली ते वाघबीळ पर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. जड अवजड वाहनांना दुरुस्तीच्या कालावधीत बंदी घालण्यात आली आहे. असे असतानाही या मार्गावर अवजड वाहतुक सुरू असल्याचे चित्र होते. त्यामुळे वाहन चालकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. अवघ्या १० ते १५ मिनीटांचे अंतर वार करण्यासाठी वाहन चालकांना सुमारे पाऊण तास लागत होता.

# भाजपच्या हस्तक्षेपावर शिंदे गटाची नाराजी; निकालानंतर पक्ष नेते आक्रमक

● ठाणे : महायुतीच्या जागावाटपाचे गणित ठरविताना उमेदवारांच्या निवडीपासून काही प्रतिष्ठेच्या जागेवर अखेरपर्यंत घासाघीस झाल्याने किमान चार जागांवर थेट फटका बसल्याचा निष्कर्ष मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षाने काढला आहे. यवतमाळ, नाशिक, दक्षिण मुंबई आणि हिंगोली या चार जागांवर उमेदवारांची निवड करताना भाजपने हस्तक्षेप केल्याचा सूर शिंदे सेनेत उमटू लागला आहे. विधानसभा निवडणुकांना सामोरे जाताना भाजपकडून येणाऱ्या सर्वेक्षणाचा हट्ट पुरवू नका अशी मागणीच शिंदे सेनेच्या प्रमुख नेत्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केल्याचे समजते.

भाजपने घोळ घातला नसता तर या चारही जागा निवडून येण्याची शक्यता होती असाही सूर पक्षात उमटत आहे. भाजपला २८ जागा लढवून नऊ जागांवर विजय मिळवता आला आहे. या उलट शिंदे सेनेने १५ जागा लढवून सात जागांवर विजय मिळविला आहे. जागावाटपात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दोन आकडी जागाही दिल्या जाणार नाहीत अशी चर्चा माध्यमांत सुरू झाली होती. ही चर्चा घडविण्यामागे कोणाची कुजबुज फळी कार्यरत होती याविषयी आता शिंदे सेनेत उघडपणे प्रश्न विचारला जाऊ लागला आहे.

चार जागा घोळामुळे पडल्या

मंगळवारी लोकसभा निवडणुकीचा निकाल लागताच, शिंदे सेनेतील काही आमदार आणि नेत्यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेत भाजपच्या कार्यपद्धतीविषयी उघडपणे नाराजी व्यक्त केल्याचे वृत्त आहे. रामटेक, हिंगोली आणि यवतमाळ- वाशिम या तीन जागांवर भाजपच्या दबावामुळे उमेदवार



बदलण्याची वेळ शिंदे सेनेवर आल्याची बोलले जाते. भावना गवळी यांना उमेदवारी देण्यात येऊ नये या भाजपच्या आग्रहापुढे आम्हाला मान तुकवावी लागली ही आमची मोठी चूक होती अशी प्रतिक्रिया शिंदे सेनेतील एका नेत्याने 'लोकसत्ता'शी बोलताना दिली. नाशिकमध्ये हेमंत गोडसे यांची उमेदवारी खुद्द मुख्यमंत्री पुत्र खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी जाहीर केली होती. मात्र, या जागेवरून अखेरपर्यंत मुख्यमंत्री आणि भाजपमध्ये रस्सीखेच सुरू होती.

## विधानसभेला खबरदारी घ्या

दक्षिण मुंबईत मिलिंद देवरा यांना रिंगणात उतरवावे यासाठी मुख्यमंत्री आग्रही होते. मात्र, येथून मराठी उमेदवारच रिंगणात असावा यासाठी भाजपने आग्रह धरल्याचे सांगितले जात होते. दरम्यान, आगामी विधानसभा निवडणूकीच्या तोंडावर आपल्या पक्षात होणारा भाजपचा हा हस्तक्षेप थांबवा आणि किमान ५० जागांवरील उमेदवार निवडीचे सर्वाधिकार आपल्याकडेच राखून ठेवावे असा आग्रह देखील काही नेत्यांनी मुख्यमंत्र्यांपुढे धरल्याचे समजते.

लोकसभा निवडणुकीच्या जय-पराजयाचे योग्य विश्लेषण पक्षात सुरू आहे. आम्हाला अधिकच्या जागा जिंकण्याची चांगली संधी होती हे मात्र निश्चित. काही गोष्टी टाळता आल्या असत्या.

**– डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार, शिवसेना शिंदे गट.**

# कल्याण पूर्वेत गाड्यांची तोडफोड करत गांवगुंडांची दहशत



● कल्याण : कल्याण पूर्वेत कोळशेवाडी पोलिस स्टेशन अंतर्गत गुन्हेगारांची दहशत कायम असून बुधवारी रात्री पोलीस स्टेशनपासून हाकेच्या अंतरावर दोन गट आपसात भिडल्याची घटना घडली. या दोन्ही गटांनी एकमेकांना हाणामारी करत दगडफेक केली. या दगडफेकीत परिसरात राहणाऱ्या नागरिकांच्या तीन महागड्या गाड्यांची तोडफोड करण्यात आली. यामुळे परिसरात भीतीचे वातावरण असून सर्वसामान्य नागरिक दहशतीखाली जगत आहेत. तर याबाबत कल्याण कोळसवाडी पोलीस ठाण्यात दोन्ही गटाच्या नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून दोघांना अटक करण्यात आली आहे. कल्याण पूर्वेतील विठ्ठलवाडी स्टेशन समोरील साई नगर परिसरात असलेल्या शॉपिंग सेंटर जवळ नायडू आणि दही या दोन गटात हाणामारी झाली. या हाणामारीत एकमेकांवर दगडफेक देखील करण्यात आली. यावेळी या परिसरात राहणाऱ्या नागरिकांच्या तीन गाड्यांची तोडफोड करण्यात आली. हा प्रकार कोळसेवाडी पोलिस स्टेशनच्या जवळच घडल्याने नगरिकांमधून संताप व्यक्त करण्यात येत असून, गुन्हेगारांवर पोलिसांचा वचक नसल्याने कल्याण पूर्वेत अशाप्रकारचे प्रकार वाढल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे.

# आरोग्यासाठी क्रॅनबेरीज चांगल्या की आपली देशी करवंदे?



उन्हाळा सुरू झाला की, अनेक हंगामी फळं बाजारात उपलब्ध होतात. विशेषत: आंबा, फणस यांबरोबर अनेक परदेशी फळांनाही मोठी मागणी असते. त्यात क्रॅनबेरी हे फळ उन्हाळ्यात अनेक जण आवडीने खातात. शरीरासाठी पोषक असलेल्या फळाचे खूप फायदे आहेत. पण, तुम्ही क्रॅनब्रेरीप्रमाणेच दिसणारी काळ्या रंगाची करवंदे कधी खाल्ली आहेत का? खेड्यापाड्यांत मोठ्या प्रमाणात मिळणारी ही रानटी करवंदे चवीला तर भारीच; पण पौष्टिक मूल्यांच्या बाबतीतही गुणकारी आहेत. त्यामुळे क्रॅनबेरीला रानातील करवंदेहा चांगला पर्याय असू शकतो. याच विषयावर दी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना मुंबईतील सर एचएन रिलायन्स फाऊंडेशन हॉस्पिटलच्या आहारतज्ज्ञ वेदिका प्रेमानी यांनी सविस्तर माहिती दिली आहे. त्यात त्यांनी क्रॅनबेरी की करवंद यापैकी आपल्या शरीरासाठी कोणते फळ उपयुक्त ठरू शकते हे सांगितले आहे.

करवंद

करवंद ज्याला काळे मनुके, असेही म्हटले जाते. भारतातातील उष्ण कटिबंधीय प्रदेशात उगवणारे हे फळ आहे. या फळापासून लोणचे, जाम, डिप्स आणि इतर अनेक गोड, आंबट पदार्थ बनवले जातात. पण, चवीपलीकडे त्यात अनेक पौष्टिक गुणधर्म आहेत; जे आपल्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरतात.

१) क जीवनसत्त्व

करवदांमध्ये क जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असते. त्यामुळे रोगप्रतिकार शक्ती वाढविण्यासह विविध आजारांपासून संरक्षण करण्यासाठी मदत होते.

२) आतड्यांच्या आरोग्यासाठी फायदेशीर

करवंदामध्ये फायबरचे प्रमाण अधिक असते; ज्यामुळे पचनक्रिया सुधारण्यास मदत होते. आतड्यांची हालचाल नियंत्रित करता येते आणि एकूणच आतड्यांच्या आरोग्यास प्रोत्साहन मिळते.

३) अँटिऑक्सिडंट घटक

अँथोसायनिन्स फ्लेव्होनॉइड्सने समृद्ध करवंद ऑक्सिडेटिव्ह तणावाशी लढण्यास मदत करते. त्वचेचे आरोग्य निरोगी ठेवते. तसेच हृदयरोग आणि टाईप-२ मधुमेह यांसारख्या जुनाट आजारांचा धोका कमी करते.

४) अत्यावश्यक जीवनसत्त्वे आणि खनिजे

करवंदामध्ये जीवनसत्त्व अ, ब, कॅल्शियम, फॉस्फरस व लोहाचे प्रमाण अधिक असते; ज्यामुळे डोळे आणि हाडांचे आरोग्य सुधारते. त्याशिवाय चयापचय आणि शारीरिक क्रिया सुधारण्यास मदत होते.

करवंद की क्रॅनबेरी, यात आरोग्यासाठी कोणते फळ चांगले?

क्रॅनबेरी आणि करवंद या दोन्ही फळांचा रंग वेगवेगळा असला तरी ही दोन्ही फळे आकार आणि चव या बाबतीत काही प्रमाणात एकसारखीच आहेत. त्यामुळे त्यांची वारंवार परस्परांशी तुलना केली जाते. याच गोष्टीवर आहारतज्ज्ञ प्रेमानी यांनी काही प्रमुख फरक सांगितले आहेत.

पापड किंवा इतर पदार्थ तळल्यानंतर उरणाऱ्या तेलाचे काय करायचे? ICMR ने दिल्या महत्त्वाच्या टिप्स

१) पौष्टिक घटक

करवंद आणि क्रॅनबेरी या दोन्हीमध्ये क जीवनसत्त्व भरपूर असते. पण, करवंदांमध्ये याचे प्रमाण थोडे जास्त असते. क्रॅनबेरीमध्ये कॅलरी आणि कार्बोहायड्रेटचे प्रमाण कमी असते.

२) चव

करवंदे काही वेळा गोड आणि काही वेळा तितकीच आंबट असतात; पण क्रॅनबेरी खूप आंबट असतात.

३) किंमत आणि उपलब्धता

भारतात करवंद हे स्थानिक आणि हंगामी फळ आहे. त्यामुळे ते आयात केलेल्या क्रॅनबेरीपेक्षा स्वस्त असते.

करवंदे खाण्याचे 'हे' फायदे तुम्हाला माहितेयत का?

आहारतज्ज्ञ प्रेमानी यांनी करवंदांचा आहारात समावेश करण्याच्या फायद्याविषयी सांगितले आहे.

१) अधिक पौष्टिक

परदेशातून आयात होऊन येणाऱ्या फळांच्या तुलनेत स्थानिक हंगामी फळांमध्ये अधिक पौष्टिक घटक असतात.

२) पीक, फ्लेवर आणि पोषण

स्थानिक पातळीवर उगवलेली फळे चांगल्या प्रकारे परिपक्व झाल्यावर काढली जातात. त्यामुळे त्यांची चव आणि त्यातील पौष्टिक मूल्ये जास्तीत जास्त वाढतात.

३) स्थानिक अर्थव्यवस्थेला सहायक

स्थानिक फळांची निवड केल्यास स्थानिक शेतकऱ्यांना त्याचा फायदा होतो आणि वाहतुकीशी संबंधित कार्बन फूटप्रिंट कमी होतो.

# युगांडाच्या ४३ वर्षीय गोलंदाजाने रचला इतिहास! टी-२० विश्वचषकात केला सर्वात मोठा पराक्रम




टी-२० विश्वचषक २०२४ मधील नववा सामना क गटातील पापुआ न्यू गिनी आणि युगांडा यांच्यात गयानाच्या मैदानावर खेळला गेला. या सामन्यात युगांडाच्या संघाने ३ विकेट्स राखून विजय मिळवला पण दोन्ही संघांकडून अत्यंत खराब फलंदाजी दिसून आली. पापुआ न्यू गिनी संघाने प्रथम फलंदाजी करताना १९.१ षटकांत केवळ ७७ धावा केल्या होत्या, तर युगांडाने हे लक्ष्य १८.२ षटकांत ७ गडी गमावून पूर्ण केले. युगांडासाठी या सामन्यात ४३ वर्षीय डावखुरा फिरकी गोलंदाज फ्रँक न्सुबुगाने आपल्या शानदार गोलंदाजीने टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात नवा विक्रम रचला आहे.

फ्रँक न्सुबुगाने टाकला विश्वचषकातील सर्वोत्कृष्ट इकॉनॉमिकल स्पेल –

या विश्वचषकातील सर्वात वयोवृद्ध खेळाडू, युगांडाच्या संघाचा भाग असलेला फ्रँक न्सुबुगाने आता टी-२० विश्वचषकाच्या इतिहासातील सर्वोत्कृष्ट इकॉनॉमिकल ४ षटकांचा स्पेल टाकणारा गोलंदाज ठरला आहे. पापुआ न्यू गिनीविरुद्धच्या सामन्यात न्सुबुगाने ने ४ षटकात ४ धावा दिल्या आणि २ विकेट्सही घेतल्या. न्सुबुगापूर्वी हा विक्रम दक्षिण आफ्रिकेच्या संघाचा वेगवान गोलंदाज एनरिक नॉर्खियाच्या नावावर होता, ज्याने याच विश्वचषकात श्रीलंकेविरुद्धच्या सामन्यात ४ षटकात ४ विकेट्स घेऊन ७ धावा दिल्या होत्या.

टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात सर्वोत्कृष्ट स्पेल (४ षटके) टाकणारे गोलंदाज –

फ्रँक न्सुबुगा – ४ धावांत २ विकेट्स (वि. पापुआ न्यू गिनी, २०२४)

एनरिक नॉर्खिया – ७ धावांत ४ विकेट्स (वि. श्रीलंका, वर्ष २०२४)

अजंथा मेंडिस – ८ धावांत ६ विकेट्स (वि. झिम्बाब्वे, २०१२)

महमुदुल्लाह – ८ धावांत १ विकेट (वि. अफगाणिस्तान, २०१४)

वानिंदू हसरंगा – ८ धावांत ३ विकेट्स (वि. यूएई, वर्ष २०२२)

या सामन्यात युगांडासाठी रियाजत अली शाह व्यतिरिक्त एकही फलंदाज काही खास करु शकला नाही. त्याने ३३ धावांची खेळी करत संघाला विजयापर्यंत नेले. मात्र, त्याचा स्ट्राईक रेट केवळ ५८.९२ धावाच राहिला. या सामन्यात अल्पेशने आठ धावा, दिनेशने शून्य, जुमा मियागीने १३ धावा, केनेथने नाबाद सात धावा केल्या. ब्रायन खाते न उघडता नाबाद राहिला. पापुआ न्यू गिनीकडून अली नाओ आणि नॉर्मन वानुआ यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. तर चाड सोपर आणि असद वाला यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

# युगांडा संघाने पापुआ न्यू गिनीवर विजय मिळवल्यानंतर केला भन्नाट डान्स

गुरुवारी पापुआ न्यू गिनी आणि युगांडा यांच्यात टी-२० विश्वचषक २०२४ मधील नववा सामना खेळला गेला. या सामन्यात युगांडाने १० चेंडू शिल्लक असताना तीन गडी राखून विजय मिळवला. गयाना येथे खेळल्या गेलेल्या सामन्यात नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या पापुआ न्यू गिनीचा संघ १९.१ षटकात ७७ धावांवर गारद झाला. प्रत्युत्तरात युगांडाने १८.२ षटकात विजयानवर शिक्कमोर्तब केला. या पहिल्या विजयाने आनंदीत झालेल्या युगांडा संघाने भन्नाट डान्स केला, ज्याचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.

७७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना युगांडाची सुरुवात चांगली झाली नाही. सहा धावांवर संघाने तीन विकेट गमावल्या.

## दिनविशेष

**घटना**

२०२२: USB-C - युरोपियन युनियन मधील देशांनी आणि कायदेकर्त्यांनी पहिल्यांदाच मोबाइल फोन, टॅब्लेट आणि कॅमेऱ्यांसाठी सिंगल चार्जिंग पोर्ट (USB-C) वापरण्यास सहमती दर्शविली.

२०२२: भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (NHAI) बिटुमिनस काँक्रीटचा ७५ किलोमीटर (किमी) लांबीचा महामार्ग १०५ तास आणि ३३ मिनिटांच्या विक्रमी वेळेत पूर्ण करून गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड स्थापित केला आहे.

२०१७: म्यानमारच्या हवाई दलाचे शानक्सी Y8 हे अंदमान समुद्रात कोसळले आणि त्यातील सर्व१२२ लोकांचे निधन.

२००६: अबू मुसाब अल झरकावी यांची अमेरिकन हवाईदलाने केलेल्या बॉम्बहल्ल्यात हत्या.

२००४ : शिरोमणी अकाली दल (लाँगोवाल) - राजकीय पक्षाची स्थापना.

२००१: युनायटेड किंग्डम मधील निवडणुकांत टोनी ब्लेरच्या नेतृत्वाखाली लेबर पार्टीला मोठे बहुमत..

**जन्म**

१९८१: अमृता राव मराठी चित्रपट अभिनेत्री

१९७४ : महेश भूपती - भारतीय लॉन टेनिस खेळाडू - पद्मश्री

१९५५: रांजॉन घोषाल - भारतीय नाट्य दिग्दर्शक आणि संगीतकार (निधन: ९ जुलै २०२०)

१९४२ : मुअम्मर गडाफी - लिबीयाचे हुकूमशहा (निधन: २० ऑक्टोबर २०११)

१९१७ : डीन मार्टिन अमेरिकन गायक, संगीतकार निर्माते (निधन: २५ डिसेंबर १९९५)

१९१४ : के. ए. अब्बास- दिग्दर्शक, पटकथाकार, लेखक व पत्रकार (निधन : १ जून १९८७)

**निधन**

२०२२ : प्रदीप भिडे - मुंबई दूरदर्शनचे प्रसिद्ध वृत्तवाहक

२०२० : चिरंजीवी सर्जा भारतीय कन्नड चित्रपट अभिनेते (जन्म: १ ऑक्टोबर १९८४)

२०१८ : शेरीफ इस्माईल - इजिप्शियन राजकारणी, पंतप्रधान (जन्म: ६ जुलै १९५५)

२००२ : बी. डी. जत्ती - भारताचे ५वे उपराष्ट्रपती हंगामी राष्ट्रपती (जन्म: १० सप्टेंबर १९१२ )

२००१ : व्हिक्टर पाझ एस्टेन्सोरो बोलिव्हिया देशाचे ४५ वे अध्यक्ष (जन्म: २ ऑक्टोबर १९०७)

२००० : गोपीनाथ तळवलकर - बालसाहित्यिक (जन्म: २९ नोव्हेंबर १९०७)

# बॉलीवूड अभिनेत्रीने प्रचार करूनही हरले तिचे बाबा



मंगळवारी (४ जून रोजी) लोकसभा निवडणुकाच्या निकालांची घोषणा झाली. या निवडणुकीत अनेक बॉलीवूड, दाक्षिणात्य व भोजपुरी कलाकारांनी नशीब आजमावलं. यापैकी हेमा मालिनी, कंगना रणौत, रवी किशनसह काहींना यश आलं, तर काहींना जनतेने नाकारलं. बॉलीवूड अभिनेत्री नेहा शर्माचे वडील अजित शर्मा काँग्रेसच्या तिकिटावर निवडणूक लढले होते, पण त्यांना पराभवाचा धक्का बसला आहे. अजित शर्मा जेडीयूचे उमेदवार अजय मंडल यांच्याकडून पराभूत झाले.

किती मतांनी पराभूत झाले अजित शर्मा

नेहा शर्माचे वडील अजित शर्मा हे काँग्रेसचे उमेदवार होते. ते बिहारच्या भागलपूर मतदारसंघातून निवडणुकीत उभे होते. या जागेवर जेडीयूचे उमेदवार अजय मंडल यांनी अजित शर्मा यांचा पराभव केला. अजित शर्मा यांना २ लाख १३ हजार ३८३ मतं मिळाली. तर जेडीयूचे अजय मंडल यांना २ लाख ७९ हजार ३२३ मतं मिळाली.

नक्की वाचा

"रंगाबिल्लाचा माज ठेचला गेला", निकालांबद्दल किरण मानेंची पोस्ट

नेहा शर्माने वडिलांसाठी केला होता प्रचार

निवडणुकीदरम्यान नेहा शर्माने वडील अजित शर्मा यांचा जोरदार प्रचार केला होता. मात्र अभिनेत्रीची लोकप्रियता आणि प्रचारही वडिलांना विजय मिळवून देऊ शकला नाही. नेहा शर्माला तिच्या वडिलांच्या पराभवाचा धक्का बसला आहे, मात्र तिने सोशल मीडियावर पोस्ट करून तिच्या समर्थकांचे आभार मानले आहेत.

# " मला इथे बसून तुम्हाला काही सांगण्याची गरज वाटत नाही", जोस बटलर पत्रकारावर संतापला!



सध्या ट्वेंटी-२० विश्वचषकाचा थरार रंगला आहे. गतविजेत्या इंग्लंडने स्कॉटलंडचा पराभव करून विजयी सलामी दिली. या सामन्यापूर्वी इंग्लिश कर्णधार जोस बटलर आणि पत्रकारामध्ये बाचाबाची झाल्याचे कळते. इंग्लंडने अलीकडेच मायेदशात पाकिस्तानविरूद्ध ट्वेंटी-२० मालिकेत २-० असा विजय मिळवला. याशिवाय फिल सॉल्ट, विल जॅक्स आणि जोस बटलर यांसारख्या प्रमुख खेळाडूंनी आयपीएल २०२४ मध्ये चांगली कामगिरी केली. केवळ इंग्लंडचेच नव्हे तर आयपीएलमध्ये इतर देशांतील खेळाडूंनी देखील अप्रतिम कामगिरी केली.

जोस बटलरच्या नेतृत्वातील इंग्लिश संघाने मागील वर्षी भारतात झालेल्या वन डे विश्वचषकात निराशाजनक कामगिरी केली. यावरून बटलरवर मोठ्या प्रमाणात टीका झाली. याचाच दाखला देत एका पत्रकाराने बटलरला प्रश्न केला असता तो संतापला. वन डे विश्वचषकात इंग्लंडने पाकिस्तान, बांगलादेश आणि नेदरलँड्ससारख्या कमकुवत संघांविरुद्ध विजय मिळवले.मात्र, त्यांना अफगाणिस्तानविरूद्ध पराभव पत्करावा लागला.

बटलरची संतप्त प्रतिक्रिया

इंग्लंडचा कर्णधार पत्रकारावर संतापला. वन डे विश्वचषकातील खराब कामगिरी, यामुळे संघाच्या मनोबलावर परिणाम झाला आहे का? यावेळी काय रणनीती असेल? या प्रश्नावर बटलरने संतप्त प्रतिक्रिया देताना सुरुवातीला उत्तर देणे टाळले. मग ट्वेंटी-२० विश्वचषकाच्या स्पर्धेवर लक्ष केंद्रित केले असल्याचे बटलरने सांगितले. पण प्लेइंग इलेव्हनबद्दल विचारणा केली असता तो संतापला. "संघ काय आहे आणि मी संघात आहे की नाही हे सांगणार नाही. एक संघ म्हणून आम्ही जे काही करण्याचा प्रयत्न करत आहोत त्याबद्दल मी खूप समाधानी आहे. मला इथे बसून तुम्हाला सांगण्याची गरज वाटत नाही", असे इंग्लिश कर्णधाराने सांगितले.

विश्वचषकासाठी इंग्लंडचा संघ -

जोस बटलर (कर्णधार), मोईन अली, जोफ्रा आर्चर, जॉनी बेअरस्टो, हॅरी ब्रूक, सॅम करन, बेन डकेट, टॉम हार्टले, विल जॅक्स, ख्रिस जॉर्डन, लियाम लिव्हिंगस्टन, आदिल राशिद, फिल सॉल्ट, रीस टोप्ली, मार्क वुड.

## राशि भविष्य

**मेष:** अतिशय प्रभावी व्यक्तींच्या पाठिंब्यामुळे तुमचे मनोधैर्य उंचावेल. आज तुम्हाला पैश्याने जोडलेली काही समस्या येऊ शकते ज्याला सुरळीत करण्यासाठी तुम्ही आपल्या पिता किंवा पितातुल्य कुणी माणसाकडून सल्ला घेऊ शकतात. पूर्वजांच्या संपत्तीचे उत्तराधिकारी होण्याची बातमी संपूर्ण कुटुंबाला आनंद देईल.

**वृषभ:** तुम्हाला एखाद्या धार्मिक स्थळी जाण्याची इच्छा होईल. त्यासाठी तुम्ही धार्मिक स्थळी जाऊन ज्ञानी-योगी-दैवी व्यक्तीला भेटून त्यांच्यादजवळून ज्ञान मिळवाल, आशीर्वाद मिळवाल. काही जणांसाठी प्रवास केल्याने थकून जाल आणि तणाव वाढला तरी आर्थिकदृष्ट्या फायद्यात राहाल.

**मिथुन:** आपण जर पुरेशी विश्रांती घेत नसाल तर आपणास प्रचंड दमल्यासारखे होईल, आणि अधिक विश्रांती घ्यावी लागेल. रात्रीच्या वेळी तुम्हाला आज धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे कारण, तुमच्या द्वारे दिले गेलेले धन आज तुम्हाला परत मिळू शकते.

**कर्क:** तुमच्या तणावमुक्तीसाठी तुम्ही कुटुंबातील सदस्यांचा पाठिंबा घ्या. त्यांची मदत घेणे उपकारक ठरेल. तुमच्या भावना आणि तणाव आतल्या आत दाबून ठेवू नका. आपल्या समस्या दुसऱ्यांना सांगण्याने त्या सोडविण्यासाठी त्यांची मदत घेणे संयुक्तिक ठरते.

**सिंह:** खाण्यापिण्याबाबत दक्षता बाळगा. निष्काळजीपणा तुम्हाला आजारी पाडू शकतो. दीर्घकाळ प्रलंबित असणारी थकबाकी आणि येणे अंतिमत: प्राप्त होईल. मुलांच्या यशस्वी होण्यामुळे तुम्हाला अभिमान वाटेल. तुमचे हास्य हे तुमच्या प्रियजनांच्या असमाधानावरचे उत्तम औषध आहे.

**कन्या:** तुमच्या प्रकृतीची काळजी घ्या. प्रलंबित देणी आल्यामुळे आपली सांपत्तिक स्थिती सुधारेल. आपल्या कुटुंबियांबद्दल कायम आपुलकीने वागा, त्यांच्यासोबत प्रेमाचे आनंदाचे चार क्षण व्यतीत करा. तुमच्या स्वप्नातील राजकुमारीशी आज तुमची भेट झाल्यामुळे तुमचा आनंद गगनात मावणार नाही, तुमचे हृदय धडधडेल.

**तूळ:** तुमच्या तणावमुक्तीसाठी तुम्ही कुटुंबातील सदस्यांचा पाठिंबा घ्या. त्यांची मदत घेणे उपकारक ठरेल. तुमच्या भावना आणि तणाव आतल्या आत दाबून ठेवू नका. आपल्या समस्या दुसऱ्यांना सांगण्याने त्या सोडविण्यासाठी त्यांची मदत घेणे संयुक्तिक ठरते.

**वृश्चिक:** प्रत्येकाला मदत करण्याच्या इच्छेमुळे तुम्ही आज थकून जाल, दमून जाल. घराच्या दृष्टीने केलेली गुंतवणूक फायदेशीर ठरेल. कुटुंबाची आघाडी आनंदी आणि सुरळित असणार नाही. आजच्या दिवशी प्रेमामध्ये यातना सहन कराव्या लागण्याची शक्यता आहे. प्रलंबित प्रकल्प आणि योजनांना अंतिम स्वरूप मिळेल.

**धनु:** तुमच्या संशयी स्वभावामुळे तुम्हाला पराभवाला सामोरे जावे लागेल. आर्थिक स्थिती चांगल्या प्रमाणात सुधारेल, मात्र त्याचवेळी खर्चाचे प्रमाण देखील वाढलेले असेल. तुमच्या अतिखर्चिक जीवनशैलीमुळे तुम्हाला घरात तणावाचा सामना करावा लागेल. त्यामुळे रात्री उशिरापर्यंत बाहेर राहणे टाळा आणि इतरांवर खर्च करणे टाळा.

**मकर:** चार भिंतीबाहेरील उपक्रम तुमच्यासाठी लाभदायक ठरतील. बंदिस्त किल्ल्याप्रमाणे स्वत:भोवती सुरक्षित चौकट आखून त्याचाच विचार करण्याची जीवनशैली तुमच्या शारीरिक तसेच मानसिक आरोग्यासाठी मारक आहे. तुम्हाला ही जीवनशैली चिंताग्रस्त आणि उदास बनवणारी असते.

**कुंभ:** प्रचंड चिंता आणि तणावामुळे तुमची प्रकृती बिघडेल. गोंधळ व नैराश्य टाळा आणि मानसिक स्पष्टता ठेवा. जीवनाच्या गाडीला चांगल्या प्रकारे चालवण्याची इच्छा आहे तर, आज तुम्हाला पैश्याच्या बाबतीत विशेष काळजी घ्यावी लागेल. पत्नीबरोबर सहलीला जाण्यासाठी दिवस खूपच चांगला आहे.

**मीन:** अतिशय प्रभावी व्यक्तींच्या पाठिंब्यामुळे तुमचे मनोधैर्य उंचावेल. आज घरातून बाहेर जातांना मोठ्यांचा आशीर्वाद घेऊन निघा यामुळे तुम्हाला धन लाभ होऊ शकतो. भरपूर आनंदाचा दिवस, जेव्हा तुमचा जोडीदार तुम्हाला खुश करण्याचा प्रयत्न करेल.

# ठणठणाट, १० टक्के पाणीकपात; धरणांत ६.७८ टक्के साठा: मुंबईसह ठाणे, भिवंडीलाही फटका



● मुंबई : पाण्याचे बाष्पीभवन होत असल्याने मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही धरणांमध्ये फक्त ९८ हजार १८२ दशलक्ष लीटर (फक्त ६.७८ टक्के) पाणीसाठा शिल्लक आहे. जुलैच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पुरेल इतकेच हे पाणी असल्याने महापालिकेने मुंबईत बुधवार, ५ जूनपासून दुप्पट म्हणजे १० टक्के पाणीकपात लागू केली आहे. दरम्यान, ही कपात ठाणे व भिवंडीतही लागू असणार आहे, असे पालिकेच्या जल विभागाकडून सांगण्यात आले आहे.

मोडक सागर, मध्य वैतरणा, अप्पर वैतरणा, भातसा, तानसा, विहार व तुळशी या सात धरणांतून मुंबईला दररोज तीन हजार ९५० दशलक्ष लीटर पाणीपुरवठा होतो.

जेमतेम महिनाभर पुरेल साठा-

१) मुंबईकरांची वर्षभराची तहान भागवण्यासाठी सातही धरणांत १४ लाख ४७ हजार ३६३ दशलक्ष लीटर पाण्याची गरज भासते.

२) २९ मे रोजी सातही धरणांमध्ये एक लाख २५ हजार ४५२ दशलक्ष लीटर पाणीसाठा उपलब्ध असून, राज्य सरकारने अतिरिक्त दोन लाख २८ हजार १४० दशलक्ष लीटर राखीव पाणीसाठा उपलब्ध करून दिले आहे.

३) मात्र, हा पाणीसाठा जुलैच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पुरेल इतकाच आहे.

४) २०२१-२२ या दोन वर्षांत १५ ऑक्टोबरपर्यंत मान्सून सक्रिय होता. मात्र २०२३ मध्ये ऑक्टोबरमध्ये तुलनेने पाऊस झाला नाही.

५) त्यामुळे गतवर्षीच्या तुलनेत यंदा धरणांमध्ये सुमारे ५.६४ टक्के पाणीसाठा कमी आहे. सातही धरणांतील पाणीसाठ्यावर पालिका अत्यंत बारकाईने लक्ष ठेवून आहे.

# माथेरान चा गणपती विसर्जन तलावाची अवस्था बिकट

● माथेरान - माथेरान मध्ये वॉकर टॅंक (बालडी)नावाने ओळखले जाणाऱ्या गणपती विसर्जन तलावाची अवस्था गेल्या काही महिन्यातच बिकट होऊन गेली. या ठिकाणी माथेरानचे गणपती विसर्जन होत असते तसेच दशक्रिया विधीकार्य येथे होत असतात या तलावाची दरवर्षी डागदुजी केली जाते दोन वर्षा पूर्वी येथे प्ले परिवार ब्लॉकचे बसून व्यवस्थित पायऱ्या केल्या होत्या विसर्जन ठिकाणी सिमेंटच्या कठडा केला होता परंतु माथेरान मधील अनेक घोडे येथे धुण्यासाठी आणल्याने गणपती विसर्जन तलावाची अवस्था बिकट होउन गेली आहे सर्व पायऱ्या तुटून गेल्या आहेत तर तलावासमोर घाणीचे



साम्राज्य पसरले आहे, आपल्याच मुक्या जनावरांना पाणी पाजणे आंघोळ घालणे ह्याला कोणी विरोध ही केला नाहि परंतु ह्या गोष्टी करत असताना आपल्याच गावाचे नुकासान करायचे ह्या बाबत नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त होत आहे, तरी नगरपालिका प्रशासनाने या ठिकाणीं गेट लावावा अन्यथा दस्तुरीची घोड्यामुळे काय अवस्था झालीय ये नागरिक पाहताच आहे , अशीच अवस्था हळू हळू इतर ठिकाणीं होऊ नये या साठी प्रशासनाने जागे होणे गरजेच आहे.ज्याच्या हाती कायदे अधिकार आहेतं अश्या प्रशासनाला वन विभागाला आता श्री डी चस्माचीच गरज लागेल का,?

# मारवा पुलाचे बांधकाम करणाऱ्या कंत्राटदाराचे शिवसैनिकांनी फोडले कार्यालय, धीम्या गतीने सुरू असलेल्या कामाचा निषेध

● घाटकोपर - पवईच्या चांदिवली येथील मारवा पुलाचे बांधकाम गेले तीन वर्ष कासव गतीने सुरू आहे. याला त्रस्त होऊन बुधवार दि 5 रोजी शिवसेना शिंदे गटाचे विधानसभा प्रमुख अशोक माटेकर, माजी नगरसेविका अश्विनी माटेकर यांच्या नेतृत्वात शेकडो शिवसैनिकानी इथल्या कंत्राट दाराचे ऑफिस आणि जेसीबी ची तोडफोड केली. पवई वरून अंधेरी एमआयडीसी , मरोळकडे जाण्यासाठी हा मारवा पूल जवळचा रस्ता आहे. मात्र 2021 रोजी हा पूल धोकादायक झाल्याने पालिकेने तो बंद केला होता. हा पूल नव्याने उभारण्यासाठी पालिका पूल विभागाने ए आर कन्स्ट्रक्शन या कंत्राटदाराला तब्बल 11 कोटीचे जानेवारी 2022 ला कंत्राट दिले.



31 डिसेंबर 2023 या दोन वर्षांच्या कालावधी मध्ये हा पुल उभा करून देण्याची अट होती. मात्र काम कासव गतीने सुरू राहिले. पालिकेने पुन्हा मे 2024 पर्यंत कंत्राटदाराला मुदत वाढून दिली आणि तीन कोटी निधी ही वाढवून दिला.मात्र या वेळेत ही काम पूर्ण झाले नाही आणि आणखी एक महिना अजून हे काम पूर्ण होईल अशी शक्यता दिसत नाही.या पावसाळ्यात या ठिकाणी स्थिती आणखी वाईट होऊ शकते. आजूबाजूच्या दहा हजार नागरिकांची इथे वस्ती असून जी या पुलाचा वापर करीत होती.

त्याच बरोबर आजू बाजूला मोठ्या इंडस्ट्रियल इस्टेट मध्ये येणारे कामगार या पुलाचा मोठया प्रमाणात वापर करीत होते.मात्र हा पूल तुटल्याने सुमारे तीन ते चार किलोमीटर चा वळसा घालून नागरिकाना प्रवास करायला लागतो आहे. या बाबत शिवसेना शिंदे गटाचे विधानसभा प्रमुख अशोक माटेकर यांनी पालिका अधिकाऱ्यांकडेवारंवार तक्रार करून ही हे काम पूर्ण होत नसल्याने आज शेकडो शिवसैनिकांना सोबत घेऊन त्यानी या पुलाजवळ जोरदार आंदोलन केले. घोषणाबाजी करीत इथले तात्पुरते उभारलेले कंत्राटदाराचे कार्यालय आणि उभा असलेला जेसीबी फोडून टाकला आहे.या वेळी पुढील दहा ते पंधरा दिवसात जर हा पूल काम करून नागरिकांसाठी खुला केला नाही तर पालिकेच्या पूल विभागासमोर ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा या वेळी अशोक माटेकर यांनी दिला आहे.

# नर्सिंग असिस्टंट च्या माध्यमातून समाजसेवा शक्य- डॉ. नितीन गांधी

● अलिबाग - उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्था व जन शिक्षण संस्थान रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने नानासाहेब कुंटे तांत्रिक विद्यालय वरसोली येथे "असिस्टंट नर्सिंग" या कोर्सचे दिमाखात उद्धाटन करण्यात आले. समाजातील गरीब व गरजू बेरोजगार युवक-युवतींना स्वतःच्या पायावर उभे राहून त्यांनी स्वयंरोजगार निर्माण करण्यासाठी संस्थे तर्फे पहिली बॅच मोफत शिकवण्यात येणार आहे. ही बॅच उज्ज्वल भविष्य नानासाहेब कुंटे तांत्रिक विद्यालय व जन शिक्षण संस्थान रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने चालवली जाणार असून विद्यार्थ्यांना कौशल भारत - कुशल भारत (Skill India) अंतर्गत केंद्र सरकार मान्यता प्राप्त कोर्स पूर्णत्वाचे प्रमाणपत्र दिले जाणार आहेत. या बॅचमध्ये 20 विद्यार्थ्यांनाच प्रवेश देण्यात आला आहे.



जन शिक्षण संस्थान चे संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा किरीट सोमैया यांच्या मार्गदर्शनाखाली जे. एस. एस. रायगड हि संस्था मागील 20 वर्षापासून सक्रीय पणे व्यवसाय प्रशिक्षण देण्याचे कार्य करीत आहे. तरी सदर कार्यक्रमाच्या प्रसंगी सुरुवातीला सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले व नंतर जे.एस.एस. चे चेअरमन डॉ. नितीन गांधी यांनी विद्यार्थ्यांना असिस्टंट नर्सिंग कोर्सचे महत्व सांगितले, तसेच तांत्रिक विद्यालय वरसोली अध्यक्ष उदय जोशी यांनी सुद्धा या विद्यार्थ्यांना आपल्या भाषणात मोलाचे मार्गदर्शन केले.

जे.एस.एस. चे डायरेक्टर डॉ. विजय कोकणे, उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्थेचे अध्यक्षा मा. उज्ज्वला चंदनशिव ,डॉ. चिखलकर, डॉ. राजाराम हुलवान यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व नंतर आभार मानून कार्यक्रमाचा समारोप केला.

या उद्धाटन कार्यक्रमाकरिता नानासाहेब कुंटे तांत्रिक विद्यालयाचे सुरेंद्र जोशी, अविनाश राऊळ, उज्वल भविष्य सामाजिक संस्थेचे संचालक रोशन पंडित, सदस्य मनीष पंचमुख , डॉ. स्वप्नील चिखलकर जे. एस. एस. स्टाफवर्ग, समन्वयक कुमार ठाकूर, पूजा लाडे व सर्व विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.

# Central Information Commission can't comment on utilisation of MPLADS funds by legislators: Delhi HC

● Delhi - The Delhi High Court recently observed that the Central Information Commission (CIC) has no jurisdiction to comment on the utilisation of funds by the members of Parliament under the Members of Parliament Local Area Development Scheme.

A single-judge bench of Justice Subramonium Prasad said in its May 15 order, "The Ld. CIC has no jurisdiction to comment upon the utilization of funds by the Members of Parliament under the Members of Parliament Local Area Development Scheme (MPLADS). The scope of the RTI Act is only to ensure that information sought for under the RTI Act is dissipated in order to secure access to information under the control of public authorities."

The high court made the observations while hearing a plea filed by the Ministry of Statistics and Programme Implementation challenging an order of the CIC passed in relation to an RTI application.

One Ram Gopa Dixit had filed an RTI application with the Lok Sabha's central public information officer seeking information on the "work initiated, pending and completed" by Rajesh Diwakar when he was the Hathras MP. Dixit had also sought information on the name of the agencies involved in the construction/initiation/ completion of various public welfare projects in the Hathras constituency along




with "details of MPLADS fund utilization and status of works recommended and executed in North Eastern Railway such as Road/Railway Station, etc".

As he was dissatisfied with the reply he had received, Dixit appealed against it and subsequently filed a second appeal before the CIC.

The CIC in its October 16, 2018, order said, "The Commission noticed that some MPs are not spending their MPLADS amounts in the earlier years of their term, but deliberately accumulating the funds for last year, preferably before general elections to gain advantage improperly. The representatives could not say anything on this issue.

The MPLADS is criticized for creating this kind of undue advantage to MPs vis-a-vis the contestants in the next election. If this is perpetuated there is a possibility of questioning it as unconstitutional. The Commission recommends the Ministry of Statistics and Program Implementation to prevent this kind of 'abuse' of MPLADS funds, and implement their guidelines to distribute the money equally in each year…"

# Making hip hop, house music in Marathi, 2 youths try to go international with rooted music

● PUNE - "Taambdi Chaamdi chamakte unhata" ("brown skin shines in the sun" is the hook of the current track 22 on Local Pune Pulse on Spotify.

It is a single by Shreyas Sagvekar (27) and DJ Kratex (29), are the faces of new genres in Marathi Indie music, where Kratex's house music meets Sagvear's rap music.

Sagvekar had to run a lot of errands in the scorching heat




of this summer.


"I used to step out of the house and sun rays would pierce through skin and make me all sweaty by the time I reached the studio. I saw how the sun rays would make my brown skin shine, that's where Taambdi Chaamdi gets its hook from", he said.

About the rap, Sagvekar says, "It is about a middle-class Marathi boy going about his day, stopping in the middle of the commute to splash water on his face to feel better. But it is also about what me and Kratex, as Marathi individuals, are trying to achieve in the music industry. It is about admiring that struggle and the dream of taking it forward internationally".

About his track "Bharlela Taat" ("A plate full"), he says, "The genres in which I write, most of the songs tell stories about people for whom it is difficult to put food on their table. But that was not the case with me. I am grateful my parents could provide me with a roof over my head and food everyday. So I write about other challenges of a middle class Marathi boy".

# Mumbai receives pre-monsoon showers as IMD forecasts more rain ahead

● Mumbai - Mumbai News Live Updates: The India Meteorological Department (IMD) issued a yellow alert for thunderstorms and lightning in Mumbai, Thane, and Raigad districts starting Thursday. Mumbai experienced pre-monsoon showers on Wednesday morning, bringing moderate rain and cloudy skies to parts of the city. The showers provided relief from the hot and humid conditions experienced on Tuesday when temperatures reached nearly 36°C. Some areas



of Mumbai faced waterlogging, and Thane district saw light rain during the same period.

What is happening in politics? Maharashtra Deputy Chief Minister Devendra Fadnavis, taking responsibility for the BJP's setback in Maharashtra during the Lok Sabha elections, offered to step down as Maharashtra's Deputy Chief Minister on Wednesday. This marks the second time Fadnavis has expressed his wish to step aside from government roles to focus on leading the Bharatiya Janata Party (BJP) in Maharashtra. Meanwhile, following Fadnavis's offer to resign, Chief Minister Eknath Shinde emphasised on collective responsibility and attributed the Opposition's victory to a "false narrative" suggesting the BJP would alter the Constitution. Shinde added that he would discuss the matter with the senior BJP leader.

# अमित देशमुख यांच्या नेतृत्वावर मराठवाड्यात शिक्कामोर्तब



● लातूर, प्रतिनिधी :

विलासराव देशमुख यांचे ज्येष्ठ सुपुत्र व लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमित देशमुख यांनी लोकसभा निवडणुकीत मराठवाड्यात मिळवून दिलेल्या घवघवीत यशामुळे त्यांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब झाला आहे.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत मराठवाड्यात काँग्रेसची पाटी कोरी होती. २०२४च्या निवडणुकीच्या दरम्यान माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी भाजपात प्रवेश केला त्यामुळे मराठवाड्याच्या काँग्रेसच्या नेतृत्वात पोकळी निर्माण झाली होती. अमित देशमुख यांनी ही पोकळी भरून काढायचे ठरवले. लोकसभा निवडणुकीच्या दरम्यान त्यांनी प्रचाराची धुरा स्वतःच्या खांद्यावर घेतली. महाविकास आघाडीच्या सर्व जागांवर प्रचारासाठी ते गेले. नांदेड, जालना, लातूर याबरोबरच धाराशिव, सोलापूर, xकोल्हापूर या मतदारसंघांसाठी ते प्रचाराला गेले व सर्वच जागी महाविकास आघाडीचे उमेदवार विजयी झाले. मराठवाड्यात काँग्रेसच्या नेतृत्वात पोकळी निर्माण झाली होती ती पोकळी कोण भरून काढेल असा प्रश्न पडला असताना अमित देशमुख यांनी पुढे होत आपण नेतृत्व करू शकतो हे सिद्ध करून दाखवले. मराठवाड्यात यावेळी महाविकास आघाडीने ७ जागा मिळवल्या तर महायुतीला एका जागेवर समाधान मानावे लागले. काँग्रेसने तीन जागा लढवत शंभर टक्के यश मिळवले. अमित देशमुखांनी काँग्रेसच्या कार्यकर्त्यात विश्वास निर्माण केलाच याशिवाय आघाडीतील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे व राष्ट्रवादी शरद पवार गटातील कार्यकर्त्यांमध्येही स्वतःबद्दलचा विश्वास निर्माण केला. विलासराव देशमुखांच्या नंतर अमित देशमुख यांनी आपल्या खांद्यावर नेतृत्वाची धुरा घेत कार्यकर्त्यांच्या मनात एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने ते आपले नेतृत्व पुन्हा एकदा सिद्ध करतील याबद्दल कार्यकर्त्यांच्या मनातही विश्वास यानिमित्ताने जागवला गेला आहे.

# रवींद्र वायकरांना मिळालेल्या निर्णायक ४८ मतांपैकी ४७ मतं पोस्टल होती; अवैध मतांचीही केली होती पुनर्तपासणी!

● मुंबई, प्रतिनिधी :

लोकसभा निवडणूक निकालांमध्ये एनडीएला बहुमत मिळालं तर भाजपाची मोठी पीछेहाट झाली. महाराष्ट्रात भाजपाप्रणीत महायुतीला अवघ्या १७ जागा मिळाल्या. तर मुंबईतल्या सहापैकी फक्त दोन ठिकाणी महायुतीचे उमेदवार जिंकून आले. त्यातले एक केंद्रीय मंत्री पियूष गोयल तर दुसरे शिंदे गटाचे रवींद्र वायकर! रवींद्र वायकरांना या निवडणुकीत अवघ्या ४८ मतांनी विजय मिळाला आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत देशभरात सर्वात कमी मतांनी झालेला हा विजय ठरला आहे. पोस्टल मतं रवींद्र वायकरांच्या विजयात महत्त्वाची ठरल्याचं आता स्पष्ट झालं आहे.

यंदाच्या निवडणुकीत मुंबईतल्या सहा मतदारसंघांपैकी सर्वाधित उत्सुकता लागलेला मतदारसंघ म्हणजे मुंबई उत्तर पश्चिम. निवडणुकीसाठी उमेदवार जाहीर होण्याच्या काही दिवस




आधीच ठाकरे गटातून शिंदे गटात दाखल झालेल्या रवींद्र वायकर यांना महायुतीकडून वायव्य मुंबईत उमेदवारी जाहीर झाली. या मतदारसंघासाठी शिंदे गटात दाखल झालेले संजय निरुपम आणि याच काळात शिंदे गटात आलेला अभिनेता गोविंदा हे दोघेही उमेदवारीसाठी इच्छुक होते. पण शेवटी एकनाथ शिंदेंनी रवींद्र वायकर यांनाच उमेदवारी जाहीर केली.

मतमोजणीच्या शेवटच्या फेरीत नाट्यमय घडामोडी!

वायव्य मुंबई मतदारसंघात मतमोजणीच्या शेवटच्या टप्प्यामध्ये मोठ्या नाट्यमय घडामोडी घडल्या. शेवटच्या २६व्या फेरीमध्ये अमोल किर्तीकर यांना निसटच्या मताधिक्याने विजयी घोषित करण्यात आलं. त्यानंतर ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी जल्लोषाला सुरुवात केली. पण मताधिक्याचं प्रमाण अगदीच कमी असल्यामुळे रवींद्र वायकरांनी मतांची पुनर्मोजणी करण्याची मागणी केली. त्यानुसार निवडणूक आयोगाने ९ लाख ५१ हजार ५८२ मतांची मोजणी केली.

अमोल किर्तीकरांना फक्त एक मत जास्त!

ईव्हीएम मशीनवरच्या मतांच्या पुनर्मोजणीनंतर अमोल किर्तीकरांना रवींद्र वायकरांपेक्षा फक्त एक मत जास्त असल्याचं दिसून आलं. त्यानंतर पोस्टल मतांची मोजणी करण्यात आली. या मतदारसंघात एकूण ४९ मतं पोस्टाद्वारे पाठवण्यात आली आहेत. या मतांपैकी वायकरांना ४८ मतं मिळाली. त्यामुळे एकूण मतांमध्ये रवींद्र वायकरांना ४८ मतांची विजयी आघाडी मिळाली. इंडियन एक्स्प्रेसनं यासंदर्भातलं वृत्त दिलं आहे. यानंतर अवैध ठरलेल्या पोस्टल मतांचीही तपासणी करण्यात आली. निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार, मताधिक्याचं प्रमाण अगदी कमी असल्यास अवैध ठरलेल्या अशा मतांचीही पुन्हा तपासणी केली जाते. या प्रक्रियेत अवैध ठरलेली सर्व मतं अवैधच असल्याचं निदर्शनास आलं. त्यामुळे रवींद्र वायकरांना विजयी घोषित करण्यात आलं. वायकरांना ४ लाख ५२ हजार ६४४ मतं मिळाली तर किर्तीकरांना ४ लाख ५२ हजार ५९६ मतं मिळाली.

## जितेंद्र आव्हाडांचा आरोप!

दरम्यान, अमोल किर्तीकरांचा पराभव घडवून आणल्याचा गंभीर आरोप जितेंद्र आव्हाडांनी केला आहे. “अशा प्रकारे प्रशासनानं एका पराभव होणाऱ्या उमेदवाराला जिंकण्यासाठी मदत केली. जेव्हा मतमोजणीला सुरुवात झाली, तेव्हा पोस्टाने आलेल्या मतांची आधी मोजणी झाली. त्यानंतर ईव्हीएमवर मतमोजणी करण्यात आली. पण निकालाच्या शेवटी पुन्हा करण्यात आलेल्या मतमोजणीमध्ये मात्र आधी ईव्हीएमची मतं मोजण्यात आली आणि शेवटी पोस्टाने आलेली मतं मोजली गेली. म्हणून अमोल किर्तीकरांचा आधी २ हजार मतांनी विजयी घोषित केल्यानंतरही ४८ मतांनी पराभव झाला. निवडणुकांमध्ये अशाच प्रकारे गैरव्यवहार केला जातो”, अशी पोस्ट आव्हाडांनी एक्स अकाऊंटवर केली आहे.

# लसीकरणानंतर लहान मुलांना पॅरासिटामॉल द्या! केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडून योग्य मात्रा जाहीर; पुरेसा साठा ठेवण्याचेही निर्देश

● पुणे, प्रतिनिधी :

लहान मुलांना लसीकरणानंतर अनेक वेळा ताप येतो. त्यावेळी डॉक्टरांकडून पॅरासिटामॉल औषध देण्याचा सल्ला दिला जातो. परंतु, लहान मुलांना या औषधाची नेमकी किती मात्रा द्यावयाची याबाबत स्पष्टता नव्हती. आता केंद्रीय आरोग्य विभागानेच लहान मुलांना या औषधाची किती मात्रा द्यायची हे जाहीर केले आहे. याचबरोबर या औषधांचा पुरेसा साठा ठेवण्याचे निर्देश सरकारी रुग्णालयांना देण्यात आले आहेत.

आरोग्य विभागाने सर्व जिल्हा रुग्णालयांना याबाबत सूचना केल्या आहेत. यानुसार, लहान मुलांना लसीकरणानंतर ताप आल्यावर गोळयांऐवजी वयानुसार पॅरासिटामॉलच्या द्रवरूप औषधाची मात्रा द्यावी. मुलांचे नियमित लसीकरण करण्यात येणाऱ्या रुग्णालयांत पॅरासिटामॉल औषधांचा पुरेसा साठा ठेवावा. मुलांना वयानुसार औषधाची मात्रा किती देण्यात यावी, याची माहिती लसीकरण



अधिकाऱ्यांनी पालकांना देणे आवश्यक आहे.

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागनाथ येम्पल्ले यांनी याबाबतच्या सूचना रुग्णालयांना केल्या आहेत. त्यात म्हटले आहे की, बालकांना अजूनही अर्धवट लसीकरण केले जाते. यामागे लसीकरणानंतर येणारा ताप, वेदना आणि सूज यांसारख्या किरकोळ गोष्टींची भीती कारणीभूत असते. त्यामुळे आरोग्य कर्मचारी पॅरासिटामॉलच्या गोळया मुलांच्या पालकांना वितरित करतात. या गोळयांचे तुकडे करून पाण्यात विरघळवून देण्याचा सल्ला दिला जातो. यामुळे लहान मुलांना या औषधाची जास्त अथवा कमी मात्रा मिळण्याचा धोका असतो. त्यामुळे आता द्रवरूप पॅरासिटामॉल औषध लहान मुलांना देण्यात यावे.

लसीकरणानंतर ताप आल्यास पॅरासिटामॉलची किती मात्रा द्यावी, याबाबतच्या मार्गदर्शक सूचना नव्हत्या. आता केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने नवीन मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. पॅरासिटामॉलचा डोस वयानुसार आणि गरजेनुसार दिल्यास तापाचे प्रभावी व सुरक्षित व्यवस्थापन करण्यास मदत होईल.

# केजरीवाल यांना जामीन देण्यास नकार; न्यायालयीन कोठडीत १९ जूनपर्यंत वाढ



● दिल्ली, प्रतिनिधी :

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना आणखी एक धक्का बसला आहे. कथित मद्या धोरण घोटाळयाशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात वैद्याकीय कारणास्तव अंतरिम जामिनासाठीचा त्यांचा अर्ज बुधवारी दिल्ली न्यायालयाने फेटाळला. तसेच न्यायाधीशांनी केजरीवाल यांच्या न्यायालयीन कोठडीत १९ जूनपर्यंत वाढ केली आहे. त्याचवेळी विशेष न्यायाधीश कावेरी बावेजा यांनी तिहार तुरुंग अधिकाऱ्यांना न्यायालयीन कोठडीत त्यांच्या वैद्याकीय गरजांची काळजी घेण्याचे निर्देश दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी दिलेला २१ दिवसांचा अंतरिम जामीन समाप्त झाल्यावर अरविंद केजरीवाल यांनी आत्मसमर्पण केले. मात्र, त्यानंतर अंतरिम जामीन मिळावा, यासाठी पुन्हा एकदा न्यायालयात याचिका दाखल केली होती. केजरीवाल यांच्या याचिकेवरील सुनावणी घेताना दिल्लीतील शहर न्यायालयाने त्यांच्या न्यायालयीन कोठडीत वाढ केली असून, अंतरिम जामीन अर्ज फेटाळून लावला आहे. त्यामुळे केजरीवाल यांना हा मोठा धक्का मानला जात आहे.

# पालखी सोहळा काही दिवसांवर येऊन ठेपला असतानाच इंद्रायणी नदीच्या पाण्यावर फेस

● पिंपरी, प्रतिनिधी :

आळंदी येथील इंद्रायणी नदीतील पाण्यावर जलप्रदूषणामुळे पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणात तवंग (फेस) आला आहे. मागील सलग दोन दिवसांपासून नदीतील पाण्यावर मोठ्या प्रमाणात तवंग येत आहेत. त्यामुळे श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या इंद्रायणीचे पावित्र्य धोक्यात आले आहे. दरम्यान, नदीकाठच्या गावांमध्ये प्रशासनाने तातडीने सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. इंद्रायणी नदीचा उगम हा लोणावळा परिसरातून झाला. ही नदी अनेक गावे, शहरे पार



करत आळंदीतून पुढे वाहत जाते. इंद्रायणी नदीचे १९ किलोमीटर पात्र पिंपरी-चिंचवड शहरातून वाहते. शहरातील औद्योगिक वसाहती, इंद्रायणी नदीकाठच्या कारखान्यातील रसायनयुक्त पाणी, गावांमधील मैलायुक्त पाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता थेट इंद्रायणी नदी पात्रात सोडले जाते. मैलायुक्त पाणी हे इंद्रायणी नदीला प्रदूषित करत आहे. इंद्रायणी नदी पात्रात लाखो वारकरी मोठ्या श्रद्धेने स्नान करून माऊलींचे दर्शन घेतात. परंतु, नदीची अवस्था बघता लाखो वारकऱ्यांचे आणि आळंदीतील ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे. आधीच जलपर्णीने इंद्रायणीचा श्वास गुदमरत आहे. आता त्यात जलप्रदूषणाची भर पडली असून, अवघ्या नदी पात्रात तवंग दिसत आहे. रसायनयुक्त पाणी सोडल्यानेच नदीची अशी अवस्था झाल्याचे बोलले जात आहे. गेल्या दोन दिवसांपासून पुन्हा आळंदीत पाण्यावर तवंग येत आहेत. जागतिक पर्यावरण दिनीच नदीची अशी अवस्था आहे. आषाढी पायी वारी पालखी सोहळा काही दिवसांवर येऊन ठेपला असताना नदीतील पाण्यावर तवंग आले आहेत.

# छत्तीसगड सीमेवर पोलीस-नक्षल्यांमध्ये चकमक, स्फोटके नष्ट

● गडचिरोली, प्रतिनिधी :

तेंदूपत्ता कंत्राटदारांची बैठक बोलावून पैसे उकळण्याचा नक्षल्यांचा डाव उधळून लावत जवानांनी त्यांचा तळ उध्वस्त केला. यावेळी घातक स्फोटके घटनास्थळीच नष्ट केली. नक्षल्यांनी केलेल्या गोळीबाराला जवानांनी चोख प्रत्युत्तर दिले. छत्तीसगड सीमेवरील सावरगावजवळील घनदाट जंगलात ५ जूनला सायंकाळी हा थरार घडला. महाराष्ट्र -छत्तीसगड सीमेवर ५ जून रोजी दुपारी टिपागड व कसनसूर दलमचे सदस्य सावरगाव अंतर्गत कुलभट्टी गावाजवळील डोंगरावर तेंदूपत्ता कंत्राटदारांची बैठक बोलावून पैसे उकळण्याच्या उद्देशाने तळ ठोकून असल्याची माहिती पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांना मिळाली होती. अपर अधीक्षक कुमार चिंता यांना त्यांनी सी- ६० जवानांसह नक्षलविरोधी



अभियान राबविण्यासाठी रवाना केले. महाराष्ट्र – छत्तीसगड सीमेवरील सावरगाजवळ जवानांनी शोधमोहीम सुरु केली. सायंकाळी नक्षलवाद्यांनी जवानांवर अंदाधुंद गोळीबार सुरू केला, यानंतर जवानांनीही जोरदार प्रत्युत्तर दिले. घनदाट जंगल आणि अंधाराचा फायदा घेत नक्षलवादी पळून जाण्यात यशस्वी झाले. त्यानंतर परिसरात झडती घेतली असता मोठ्या प्रमाणात तारा, बॅटरी, सोलर प्लेट्स, साहित्य आणि काही पिट्टू बॅग आढळल्या. त्या जप्त करण्यात आल्या. सुरक्षा दलाचे नुकसान करण्यासाठी कॅम्पजवळ एक चार्ज केलेला आयईडी देखील ठेवण्यात आला होता.६ जून रोजी सकाळी तो बॉम्बशोधक व नाशक पथकाच्या मदतीने नष्ट केला.

छत्तीसगड सीमेवर तेंदूपत्ता कंत्राटदारांकडून पैसे उकळण्यासाठी नक्षल्यांनी बैठक बोलावली होती. जवानांवर गोळीबार केला, पण जवानांनीही जशास तसे उत्तर दिले. नक्षली कॅम्प उध्वस्त करण्यात यश आल्याने नक्षल्यांचा घातपाताचा डाव हाणून पाडण्यात यश आले आहे. परिसरात नक्षलविरोधी मोहीम अधिक गतिमान केली आहे.

**– नीलोत्पल, पोलीस अधीक्षक, गडचिरोली.**

# दोन महिने मासेमारी बंद; बोटी किनाऱ्यावर शाकारल्या

● अलिबाग, प्रतिनिधी :

जिल्ह्यातील काही ठिकाणी मान्सून दाखल झाल्याने मासेमारी हंगाम १ जून ते ३१ जुलै असा दोन महिने बंद राहणार आहे. त्यामुळे जिल्ह्याभरातील मासळीचे लिलाव बंद होऊन कोट्यावधींची उलाढाल ठप्प झाली आहे. आता कोळी बांधवांनी आपल्या बोटीकिनारी आणून शाकारणी केली आहे.

अलिबाग सह जिल्ह्यातील अनेक बंदरावर बोटी नांगरून ठेवण्यात आले आहेत.

रायगड जिल्ह्यामध्ये पाच हजाराहून अधिक मासेमारी नौका आहेत. त्यामध्ये काही नौका यांत्रिकी तर काही बिगर यांत्रिकी आहेत. 31 मे हा मासेमारी हंगामाचा शेवटचा



दिवस होता. आता पुढील दोन महिने या बोटीत किनाऱ्यावर विसावल्या आहेत. त्यानंतर ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यापासून पुन्हा एकदा मासेमारीच्या नव्या हंगामाला सुरुवात होणार आहे. दहा महिने मासेमारी व्यवसाय चालतो. मासेमारी तून मच्छीमार आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवतात. अलिबाग ,आक्षी, रेवस,वरसोली, बोडणी, बोर्ली, आग्राव ,रेवदंडा ,नवगाव आदी बंदरांवर मासळीचा मोठ्या प्रमाणात लिलाव होतो. त्यातून कोट्यावधींची उलाढाल होते. परंतु अनेक वेळा बदलते हवामान, सांडपाण्यामुळे समुद्रात निर्माण होणारे प्रदूषण, जेली फिश असा अनेक समस्यांमुळे मासेमारीवर परिणाम होतो. त्यामुळे मासळीच्या उत्पादनात घट होते. तरी देखील जिल्ह्यातील मच्छीमार सर्व संकटांवर मात करत मासेमारीचा व्यवसाय करत आहेत. जून महिन्यात पावसामुळे उधाणा बरोबरच वारा, वादळ मोठ्या प्रमाणात येते. मासेमारीसाठी गेलेल्या बोटी अडकून पडण्याचा धोका अधिक असतो. खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे. मासेमारी बंदीमुळे मच्छीमारांनी नौका किनारी लावण्यास सुरुवात केली आहे. जिल्ह्यातील काही बंदरांवर बोटी नांगरण्यात आल्या असून काही ठिकाणी नांगरण्याचे काम आजही सुरू आहे. अनेकांना जीव देखील गमावा लागतो. तसेच पावसाळ्यात मासळी प्रजोत्पादन कालावधी असतो. "

जिल्ह्यातील किनाऱ्यांवर मोठ्या होड्या एक महिना अगोदर उभ्या केल्या आहेत. लहान होड्या बंदर किनारी नांगरण्यास आठवड्यापासून सुरुवात झाली आहे. सध्या बोटीवर प्लास्टिक आवरण टाकण्याचे काम सुरू आहे.

**- विजय गिदी, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मच्छीमार संघ, मुंबई**

# गिर्यारोहणासाठी उत्तरकाशीला गेलेल्या समूहातील नऊ जणांचा मृत्यू,

## पुण्यातील एका तरुणासह चार जण बेपत्ता

● उत्तराखंड, प्रतिनिधी :

उत्तराखंडच्या उत्तरकाशीमधील सहस्त्रताल शिखरावर चढाई करण्यासाठी गेलेल्या गिर्यारोहकांच्या मोठ्या समूहातील नऊ जणांचा खराब हवामानामुळे मृत्यू झाला आहे. ४,४०० मीटर उंचीवर असलेल्या सहस्त्रताल शिखर आणि आसपासच्या परिसरात गेल्या काही दिवसांपासून वातावरण खराब आहे. याच दरम्यान, महाराष्ट्र आणि कर्नाटकमधील काही गिर्यारोहकांचा एक मोठा समूह या शिखरावर चढाई करण्यासाठी गेला होता. त्यांच्याबरोबर एक स्थानिक मार्गदर्शकही होता. दरम्यान, खराब वातावरणामुळे या समुहातील गिर्यारोहकांचा मार्ग भरकटला. दाट धुखं आणि बर्फवर्षावामुळे या गिर्यारोहकांना २ जून रोजी कोखली टॉपच्या बेस कॅम्पजवळ रात्र काढावी लागली. थंडीमुळे गिर्यारोहकांच्या या समूहातील चार महिलांसह पाच जणांची प्रकृती खालावून मृत्यू झाला. याबाबतची माहिती



मिळताच स्थानिक प्रशासनाने जमिनीवरून आणि हवाई मार्गाने बचावकार्याला सुरुवात केली. हवाई दल, एसडीआरएफ आणि खासगी हेलिकॉप्टरच्या मदतीने या गिर्यारोहकांना वाचवण्यासाठी बचाव मोहिम हाती घेण्यात आली. दरम्यान, या बचाव पथकांना काही प्रमाणात यश मिळालं असून त्यांनी या गिर्यारोहकांच्या समूहातील ११ जणांची सुटका केली आहे. एसडीआरएफमधील वरिष्ठ अधिकारी मणिकांत मिश्रा म्हणाले, ४ गिर्यारोहक अद्याप बेपत्ता आहेत. आम्ही या बेपत्ता गिर्यारोहकांचा शोध घेत आहोत. मात्र खराब वातावरणाने पाच गिर्यारोहकांचा बळी घेतला आहे.